# महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## वीज निर्मिती - पिढ्यान् पिढ्यांसाठी






## वार्षिक अहवाल २०११-२०१२

महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## वार्षिक अहवाल
## २०११-२०१२

# वार्षिक अहवाल २०११-२०१२

## अनुक्रमणिका


| तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| संचालक मंडळ (वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत) | ०१ |
| सूचना (वार्षिक सर्वसाधारण सभा) | ०२ |
| संचालक मडंळाचा अहवाल | ०४ |
| महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य | ४० |
| लेखा परिक्षकांचा अहवाल | ४१ |
| आर्थिक ताळेबंद | ४८ |
| नफा-तोटा विवरण | ४९ |
| वित्तीय विवरण पत्रांवर टिपा | ५० |
| रोकड प्रवाह विवरण | १०४ |
| कंपनी कायदा १९५६ उपविभाग २१२ (३) प्रमाणे विवरण | १०६ |
| प्रकल्प वैशिष्ट्ये | १०७ |

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## संचालक मंडळ

(१-०४-२०११ पासून वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत)

| | |
|---|---|
| अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | **श्री. सुब्रत रथो** (०६.०७.२०१२ पर्यंत)<br>**श्री. आशिष शर्मा** (०६.०७.२०१२ पासून) |
| संचालक | **श्री. एस.जे. कुंटे** (२५.८.११ पासून १८.११.११ पर्यंत)<br>**श्री. व्ही.के. कानडे** (१८.११.११ पासून ३०.११.१२ पर्यंत)<br>**श्री. अजय मेहता** (२१.०५.१२ पासून ३१.०७.१२ पर्यंत, ३०.११.१२ पासून)<br>**श्री. अरविंद सिंग** (२१-०९-१२ पासून ३०.११.१२ पर्यंत) |
| संचालक (वित्त) | **श्री. जी.जे. गिरासे** (०१-०६-०७ पासून २१.०५.१२ पर्यंत)<br>**श्री. जे.के. श्रीनिवासन** अधिक कार्यकारी (२१.०५.१२ पासून २६.१२.१२) पर्यंत)<br>**श्री. एस.ए.एम.नकवी** (२६.१२.१२ पासून) |
| संचालक (संचलन) | **श्री. एम.जी.वाघमोडे** (११.०३.११ पासून आजपर्यंत) |
| संचालक (प्रकल्प) | **श्री. सी.एस.थोटवे** (३१.०८.०९ पासून २८.०८.१२ पर्यत)<br>२८.०८.१२ पासून अधिक कार्यकारी |
| संचालक | **श्री.पी.व्ही.पागे** (१.१२.०८ पासून आजपर्यंत) |

# सूचना

याद्वारे सूचना दिली जाते की, महाराष्ट्र राज्य वीज निर्माण कंपनी मर्यादित या कंपनीच्या भागधारकांची ७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २१ सप्टेंबर २०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता प्रकाशगड, प्रा. अनंत कणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे खालील व्यवहार करण्याकरिता आयोजित करण्यात आली आहे.

**सर्व साधारण व्यवहार**

१. दि.३१/०३/२०१२ चा लेखापरिक्षित ताळेबंद आणि या तारखेला संपलेल्या वर्षाचे नफा व तोटा लेखा याचे विविरण पत्र व त्यासोबतचे मा.संचालकांचे अहवाल व लेखापरिक्षकांचे अहवाल या सर्व कागदपत्राचा स्वीकार करून त्यावर विचार - विनिमय करणे व ते अंगीकार करणे.*

२. खालील ठरावावर विचार करणे व जर योग्य वाटले तर सुधारणा करून किंवा त्याशिवाय त्यांना सर्वसाधारण ठराव म्हणून मंजुरी देणे.

ठराव करण्यात येतो की, कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २२४ (८) (एए) सहवाचन कलम ६१९ (२) सह होते त्यातील तरतूदी आणि अन्य काही लागू होणाऱ्या तरतुदीनुसार संचालक मंडळाला या ठरावाद्वारे भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापाल यांनी कंपनी अधिनियम १९५६ कलम ६१९(२) अनुसार नियुक्त केलेल्या कंपनीच्या सांविधिक लेखा परिक्षक यांस देय असलेले दि.१ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३ या वित्तीय वर्षासाठीचे परिश्रमीक व स्वधनातून केलेले खर्च निश्चित करण्याचा अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

याशिवाय ठराव करण्यात येतो की, कंपनीचे मा.व्यवस्थापकीय संचालक यांना याद्वारे हा ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व कार्यवाही, कृती व आवश्यक बाबी करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येतात.

**विशेष व्यवहार**

३. सर्वसाधारण ठराव म्हणून खालील ठरावावर विचार करण्यात यावा व योग्य वाटल्यास तो सुधारणासह किंवा त्याशिवाय पारित करणे

ठराव करण्यात येतो की, श्री.व्ही.के.कानडे याची कंपनीचे अतिरिक्त संचालक या पदावर मंडळात, कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम - २६०, ज्याचे सहवाचन कंपनीची संस्थापन नियमावली यातील कलम ८२ नुसार दि.१८/११/२०११ पासून नियुक्ती केली व ज्यांचा कार्यकाळ या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अखेरीस संपणार आहे, त्यांना याद्वारे कंपनीचे संचालक म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

४. खालील ठरावाचा विचार करणे व योग्य वाटल्यास तो सुधारणांसह किंवा त्याशिवाय सर्वसाधारण ठराव म्हणून मंजूर करणे.

ठराव करण्यात येतो की, श्री.आशिष शर्मा यांची कंपनीचे संचालक या पदावर मंडळात कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २६० - ज्याचे सहवाचन कंपनीची संस्थापन नियमावली यातील कलम ८२ नुसार दि.०६/०७/२०१२ पासून नियुक्ती झालेली आहे; ज्यांचा कार्यकाळ या सर्वसाधारण सभेच्या अखेरीस संपत आहे, त्यांना याद्वारे कंपनीचे संचालक या पदावर कायम करण्यात येत आहे.

संचालक मंडळाचे आदेशानुसार

**राहुल दुबे**
**कंपनी सचिव**

स्थळ : मुंबई

दि. २१/०९/२०१२.

* २ मार्च, २०१३ च्या स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवाल स्वीकारण्यात आला.

**टिपा**

१) कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम १७३ (२) नुसार, वरील बाब क्र. ३ व ४ अंतर्गत विशेष व्यवहार यासाठीची स्पष्टीकरण करणारी विवरणपत्रे येथे जोडली असून ती या सूचनेचा एकालिक भाग आहेत.

२) उपस्थित राहणाऱ्या व मतदान करण्याचा अधिकार असणाऱ्या सदस्याला उपस्थिती व यासाठी आपला प्रतिपत्री नियुक्त करण्याचा अधिकार आहे. प्रतिपत्री कंपनीचा सदस्य असण्याची आवश्यकता नाही.

३) १९५६ च्या कंपनी कायदा अनुच्छेद ६१९(२) नुसार सरकारी मालकीची कंपनी आपले सांविधिक हिशेब तपासनीस हे भारताचे नियंत्रक व महालेखाकार मार्फतच केवळ नेमू शकेल आणि सांविधिक हिशेब तपासनीस मंडळाचा मेहनताना हे प्रत्येक कंपनीच्या सर्वसाधारण सभेत कंपनी सभासदांकडून मंजूर केले जाईल.

वरील कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २२४ (८) (एए) त्याचे सहवाचन कलम ६१९ (२) सह होते त्यानुसार सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यातील कंपनीच्या मा.संचालक मंडळाला कंपनीचे सांविधिक लेखापरिक्षक याना दि.०१ एप्रिल २०१२ रोजी सुरू होणाऱ्या दि.३१ मार्च २०१३ पर्यंतच्या वर्षासाठी परिश्रमिक निश्चित करणे व स्वधनातील खर्चाची प्रारपूर्ती करणे यासाठीचे अधिकार प्रदान करावेत.

४) या सूचनेत संदर्भ दिलेली सर्व कागदपत्रे कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात, या वार्षिक सर्व साधारण बैठकीच्या दिवसापर्यंत निरिक्षण करण्यासाठी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

# संचालकांचा अहवाल

प्रिय सदस्य,

आपल्या कंपनीचा ७ वा वार्षिक अहवाल आणि दि.३१ मार्च २०१२ रोजी संपलेल्या वर्षाचे लेखापरिक्षित केलेला वार्षिक लेखा सादर करताना आपल्या संचालकांना आनंद होत आहे.

## वित्तिय निष्कर्ष

(₹ लाखात)

| | २०११-१२ | २०१०-११ |
|---|---|---|
| **उत्पन्न** | | |
| वीज विक्रीचे उत्पन्न (निव्वळ) | १,२७७,३०९.५९ | १,२१४,१८३.०४ |
| इतर उत्पन्न | १५,०२८.८७ | ८,९४२.०२ |
| ठोक उत्पन्न | १,२९२,३३८.४६ | १,२२३,१२५.०६ |
| **खर्च** | | |
| वापरलेल्या साहित्याची किंमत | ९५२,८२१.२५ | ८२८,१७३.१६ |
| इतर खर्च | ११४,४२३.१३ | १२०,३४२.५८ |
| कर्मचारी खर्च | ७९,३२७.३३ | ८७,०५५.९९ |
| घसारा / कर्जफेडीची तरतूद | ४०,३८८.६५ | ४१,८१२.७१ |
| वित्तीय खर्च | ८५,३६८.०४ | ६५,७४३.३१ |
| निव्वळ करपूर्व नफा | २०,०१०.०५ | ७९,९९७.२९ |
| कर (निव्वळ) | (२१.५७) | ४९०५१.६२ |
| निव्वळ करोत्तर नफा | २०,०३१.६३ | ३०,९४५.६७ |

## वित्तीय कामगिरी

अहवाल वर्षात वीज विक्रीच्या उत्पन्नात ५ टक्के वाढ झाली. ते ₹१,२१४,१८३/- लाख यावरून ₹१,२७७,३०९/- लाख असे वाढले. तसेच इतर उत्पन्नात ६९ टक्क्याने वाढ होऊन ₹१५,०२८/- लाख असे वाढले. यामुळे एकूण वाढ ६ टक्के झाली. वापर केलेल्या साहित्याचा खर्च / किंमत यात १५ टक्के वाढ होऊन ती ₹८२८,१७३/- लाख यावरून ₹९५२,८२१/- लाख इतकी झाली. यामध्ये प्रामुख्याने कच्च्या मालाच्या खर्चाची वाढ २२ टक्के व आयात केलेल्या कोळशाची वाढ ४९ टक्के आहे. वित्तीय खर्च ३० टक्क्याने वाढून ₹६५,७४३/- लाखावरून ₹८५,३६८/- लाख झाला.

कारण नवीन परळी क्र.७ व पारस क्र.४ या युनीटसाठी घेतलेल्या कर्जाच्या व्याजाचा खर्च वाढला व खेळत्या कर्जात वाढ झाली. कर्मचारी खर्च, घसारा व इतर खर्च यामध्ये अनुक्रमे ९ टक्के, ३ टक्के व ५ टक्के अशी किरकोळ घट झाली. यामुळे एकूण नफा ३५ टक्क्याने कमी म्हणजे गतवर्षीच्या ₹३०,९४५/- लाख यावरून ₹२०,०३१/- लाख अशी झाला.

## लाभांश

महाराष्ट्र राज्यातील वीज टंचाईच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी महानिर्मिती कंपनी वीजनिर्मितीची क्षमता वाढविण्याच्या भव्य योजना अंमलात आणीत आहे. त्यामुळे भविष्यात वीज निर्मिती करणाऱ्या प्रकल्पांसाठी निधीची मोठ्या प्रमाणात गरज आहे. त्यामुळे आपल्या संचालकांनी मिळालेले आधिक्य प्रकल्पांच्या कामात पून: गुंतवण्याचे निश्चित केले आहे. यामुळे अहवाल वर्षात लाभांश देण्याची शिफारस केलेली नाही.

## प्रवर्तन कार्यातील कामगिरी

दि.३१ मार्च २०१२ रोजी महानिर्मिती कंपनीची एकूण स्थापित क्षमता ९७३७ मे.वॅ. व घटीत क्षमता ९७३७ मे.वॅ. अशी होती. नाशिक येथील युनीट क्र. १ व २ (२ × १४० मे.वॅ.) हे अनुक्रमे दि.२५/०६/२०११ आणि दि.३०/०६/२०११ पासून निवृत्त करण्यात आले.

वर्ष २०११-१२ मध्ये कोळसा आधारीत वीज निर्मिती प्रकल्पांचा सरासरी उपलब्धता अंक ८५.२२ टक्के होता. मागील वर्षी तो ८१.७४ टक्के होता. (म्हणजे ३.४८ टक्के वाढ) यावर्षी सयंत्र भार अंक हा ६५.०४ टक्के होता. मागील वर्षी तो ६१.६६ टक्के होता (३.३८ टक्के वाढ) वर्ष २०११-१२ मध्ये १६ यूनीट्सचे ओव्हरहॉलींग हाती घेण्यात आले. २०१०-११ या वर्षात १७ युनीट्सचे ओव्हरहॉलींग करण्यात आले होते. नियोजित बंदी अंक व सक्तीच्या बंदीचा अंक वर्ष २०११-१२ साठा अनुक्रमे ८.१५ टक्के व ६.६३ टक्के असे होते. वर्ष २०१०-११ मध्ये ते ५.४७ टक्के व ११.६६ टक्के होते. (वर्ष २०१०-११ मधील सक्तीची बंदी प्रामुख्याने चंद्रपूर केंद्रातील पाण्याच्या टंचाईमुळे होती.)

वायू आधारीत प्रकल्पांसाठी सरासरी उपलब्धता ९२.४३ टक्के आणि सयंत्र भार अंक ७६.०९ टक्के असा होता.

### कामगिरी दर्शक इतर अंक खालीलप्रमाणे आहेत -

वर्ष २०११-१२ मध्ये कोळसांचे वास्तविकरण ७५.५१ टक्के हाते. ते गतवर्षी ८६.०० टक्के होते. विनिर्देशित कोळसा वापर वर्ष २०११-१२ मध्ये ०.८४१ किलो / किलोवॅटवर असा होता. तो गतवर्षी ०.८५२ किलो / किलोवॅटवर होता. बॉयलर नलिका गळती वर्ष २०११-१२ मध्ये ४.१९ टक्के तर गतवर्षी ती २.३२ टक्के होती. वर्ष २०११-१२ विनिर्देशित तेल वापर ४.१९ मि.लि. / कि.वॅ.अवर असा होता मागील वर्षी तो ५.४२ मि.ली. / कि.वॅ.अवर असा होता. वर्ष २०११-१२ मध्ये सहाय्यभूत वीज वापर १०.५२ टक्के होता. गतवर्षी १०.६२ टक्के होता. वर्ष २०११-१२ मध्ये ज्वलन केलेल्या कोळशाची एकूण कॅलरीफिक मूल्य ३१६२ केकॅल / किलो असे होते. गतवर्षी ते ३२३४ केकॅल / किलो होते. वर्ष २०११-१२ मध्ये उष्णता दर २७०२ केकॅल / किलो असा होता. गतवर्षी ती २८०७ केकॅल / किलो होता. वर्ष २०११-१२ मध्ये पारेषण हानी ०.५ टक्के होती. गतवर्षी ती ०.८७ टक्के होती.

## क्षमता वाढीचा कार्यक्रम

महाराष्ट्र राज्यातील विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी, महानिर्मिती कंपनी औष्णिक वीज निर्मितीचे विविध प्रकल्प अमलात आणीत आहेत.

### अ) कार्यान्वित झालेले ऑष्णिक विद्युत निर्मिती प्रकल्प:

**५०० मे.वॅ. खापरखेडा औ.वि.केंद्र ५ (५०० मे.वॅ.)**

या प्रकल्पाच्या मुख्य यंत्रसामुग्रीची मागणी मे.बी.एच.इ.एल. यांचेकडे दि.२३/०१/२००७ रोजी नोंदविली आहे. (शून्य दिनांक) उर्वरित कारखान्यासाठी मागणी दि.०३/०७/२००७ रोजी मे.बी.जी.आर. एनर्जी सिस्टम लि. यांचेकडे केली. वर्षभरात पुढील महत्त्वाचे टप्पे पूर्ण करण्यात आले.

| अनु. क्र. | महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | पूर्ण भाराने प्रवर्तन कार्य | ०५.०८.२०११ |
| २. | प्रायोगिक कार्यास्थ | १२.११.२०११ |

या युनिटचे प्रायोगिक कार्य दि.०४/०४/२०१२ रोजी पूर्ण झाले व ते युनीट दि.१६/०४/२०१२ रोजी कार्यान्वित झाले व सध्या कार्यरत आहे.

महाराष्ट्र शासनाने वरील प्रकल्पास शासकीय निर्णय क्र. वि.नि.क. २००५ / प्र.क.२००४ / ऊर्जा-४ दि.१२/०५/२००६ अन्वये मान्यता दिली आहे.

### ब) कार्यरत होणारे प्रकल्प: ४२३० मे.वॅ.

**१. भुसावळ औ.वि.केंद्र युनीट क्र.४ व ५ (२ × ५०० मे.वॅ.).:**

मुख्य प्रकल्प सामग्रीसाठी मे.बी.एच.इ.एल. यांच्याकडे दि.२३/०१/२००७ रोजी मागणी नोंदविली (शून्य दिनांक) उर्वरित साधनांची मागणी मे.टाटा प्रोजेक्ट्स लि. यांना दि.०५/११/२००७ रोजी दिली. कामाचे खालील टप्पे यावर्षात पूर्ण झाले.

| अनु.क्र. | युनीट - ४ चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | स्टीम ब्लोईंग | १९.०४.२०११ |
| २. | सेफ्टी व्हॉल्व फ्लोटींग | ३०.०४.२०११ |
| ३. | रोलींग ऑफ टर्बाइन | १०.०५.२०११ |

| | | |
|---|---|---|
| ४. | युनीट सिंक्रोनायझेशन | ११.०५.२०११ |
| ५. | कोल फायरींग | २९.०९.२०११ |
| ६. | फूल लोड ऑपरेशन | ०७.०३.२०१२ |

या युनीटचे प्रायोगिक कार्य दि.१८/०७/२०१२ रोजी पूर्ण झाले.

| अनु.क्र. | महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | हायड्रॉलीक टेस्ट - नॉन ड्रेनेबल | २८.०८.२०११ |
| २. | बॉक्सींग आप ऑफ टर्बाइन | २५.०६.२०११ |
| ३. | बॉक्सींग अप ऑफ जनरेटर | १५.०७.२०११ |
| ४. | बॉयलर लाईट अप | २२.११.२०११ |
| ५. | अल्कली बॉईल आऊट अॅड ॲसिड क्लिनींग | ३०.११.२०११ |
| ६. | स्टीम ब्लोईय | १२.०२.२०१२ |
| ७. | युनीट सिंक्रोनायझेशन | ०३.०३.२०१२ |
| ८. | कोल फायरींग | ०३.०३.२०१२ |
| ९. | फूल लोड ऑपरेशन | ३०.०३.२०१२ |

महाराष्ट्र शासनाने वरील प्रकल्पांना शासन निर्णय क्र. वि.नि.क. २००५ / प्र.क्र.२०४४ / ऊर्जा - ४ दि.१२/०५/२००६ अन्वये मान्यता दिली.

### २. चंद्रपूर औ.वि.केंद्र - युनीट ८ व ९ (२ × ५०० मे.वॅ.)

मुख्य यंत्रसामग्रीसाठी मे. बी.एच.इ.एल. यांचेकडे दि.२५/०७/२००८ रोजी मागणी नोंदविली. (शून्य तारीख - ०९/०२/२००९) उर्वरित सामग्रीची मागणी दि.१२/०६/२००९ रोजी मे.बी.जी.आर. एनर्जी सिस्टीम लि. चेन्नई यांना दिली. यावर्षात पुढील महत्त्वाचे टप्पे पूर्ण झाले.

| अनु.क्र. | युनीट - ८ चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | कंडेस्टर इरेक्शन प्रारंभ | ३१.०३.२०१२ |
| २. | टी.जी.इरेक्शन प्रारंभ | ३१.०३.२०१२ |

| अनु.क्र. | युनीट - ९ चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | बॉयलर ड्रम लिफ्टींग | २५.०९.२०११ |

या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. युनीट ८ चे कार्यान्वयीत नोव्हेंबर - २०१३ मध्ये तर युनीट - ९ चे कार्यान्वयीत फेब्रुवारी २०१४ मध्ये होईल अशी अपेक्षा आहे.

महाराष्ट्र शासनाने वरील प्रकल्पास शासन निर्णय क्र. प्रकल्प - २००७ / प्र.क.- ११०६/ ऊर्जा - ४ दि.०५/०३/२००८ अन्वये मान्यता दिली आहे.

## ३. परळी औ.वि.केंद्र युनीट - ८ (२५० मे.वॅ.)

मुख्य यंत्रसामग्रीची मागणी मे.बी.एच.इ.एल. यांच्याकडे दि.२०/०१/२००९ रोजी (शून्य तारीख) नोंदली आहे. नॅचरल ड्राफ्ट कूलींग टॉवर (एन.डी.सी.टी.) यांस व्याप्तीतून वगळून उर्वरित सामग्रीसाठी मे.सुनील हायटेक इंजिनिअर्स लि. यांचेकडे दि.०१/०१/२०१० रोजी मागणी नोंदविली. एन.डी.सी.टी. - फिल्म फिल्म्स सह यांची मागणी मे.गॅमन इंडिया लि. यांच्याकडे दि.०५/०१/२०१० रोजी नोंदविला या वर्षात पुढील महत्त्वाचे टप्पे पूर्ण झाले.

| अनु.क्र. | युनीट - ८ चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १. | बॉयलर ड्रम लिफ्टींग | १०.०४.२०११ |

प्रकल्पाची कामे प्रगती पथावर आहे. या युनीटचे कार्यान्वयीन सप्टेंबर २०१३ मध्ये अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासनाने वरील प्रकल्पास शासन निर्णय क्र.प्रकल्प-२००८/ प्र.क्र.१४९१/ ऊर्जा - ४ दि.२६/०५/२००९ अन्वये मान्यता दिली आहे.

## ४. कोराडी औ.वि.केंद्र युनीट - ८, ९ व १० (३ × ६६० मे.वॅ.):

बॉयलर व टर्बो जनरेटर पॅकेज याची मागणी मे.एल. अँड टी. यांना दि.२३/०९/२००९ (शून्य दिनांक) रोजी दिली. उर्वरित कारखान्यांची मागणी मे.लँको इन्फ्राटेक लि. हरयाना यांना दि.२७/०७/२०१० रोजी दिली.

प्रकल्पाचे पुढील काम प्रगतीपथावर आहे. वर्षभरात पुढील महत्त्वाचे टप्पे पूर्ण झाले.

| अनु.क्र. | युनीट - ८ चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १ | कंडेसर इरेक्शनच्या कामाचा आरंभ | १०.०५.२०१२ |

| अनु.क्र. | युनीट - ९ चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १ | टी.जी. इमारतीच्या रचनेच्या उभारणीचा प्रारंभ | १०.०६.२०११ |
| २ | बॉयलर इरेक्शनच्या कामाचा आरंभ | २८.१०.२०११ |

| अनु.क्र. | युनीट - १० चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १ | टी.जी. फाऊंडेशन व डेक कामाचा आरंभ | १८.०६.२०११ |
| २. | टी.जी. इमारतीच्या रचनेच्या उभारणीचा आरंभ | १५.१२.२०११ |
| ३. | बॉयलर उभारणीचा आरंभ | १५.०२.२०१२ |

पुढील प्रकल्पाची कामे प्रगती पथावर आहे.

युनीट - ८ चे कार्यान्वयीन डिसेंबर २०१३ मध्ये व त्यानंतर युनीट - ९ चे जून २०१४ मध्ये आणि युनीट - १० चे डिसेंबर २०१४ मध्ये अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पास शासन निर्णय क्र. प्रकल्प - २००८/ प्र.क्र.११८९/ ऊर्जा - ४ दि.१४/१०/२००८ नुसार मान्यता दिली आहे.

**भविष्यातील प्रकल्प (१३५३० मे.वॅ.):**

१. **उरण वायू आधारीत संमीश्र चक्र वीज प्रकल्प (१२२० मे.वॅ.):** (गट - १, ४०६ मे.वॅ. गट - २ - ८१४ मे.वॅ.) जमीन, पाणी व इतर सांवधिक बाबींचा निपटारा उपलब्ध झाला आहे.

महाराष्ट्र शासनाने १२२० मे.वॅ. संमिश्र चक्र वीज प्रकल्प, उरण यास शासन निर्णय क्र. प्रकल्प ०८ / प्र.क.१२४६ / ऊर्जा - ४ दि.०२/०३/२०१० नुसार मंजुरी दिली आहे.

उरण येथील १२२० मे.वॅ. प्रगत वर्गीय वायू टबाईन आधारीत सीसीपीपी केंद्रिय वीज प्राधिकरणाचे परिपत्रक दि.१९/०३/२०१२ यातील दिलेल्या सूचना नुसार रद्द करण्यात आला. कारण देशांतर्गत वायूचे उत्पादन कमी होत असल्याने विकासकांनी वायू अधारीत प्रकल्पाच्या योजना सन २०१५-१६ पर्यंत करू नयेत अशी सूचना त्यात होती.

२. **भुसावळ औ.वि.केंद्र युनीट ६ (१ × ६०० मे.वॅ.):**

**जमीन:** प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्यात आली.

**पाणी:** हातनूर धरण व सुधगाव बंधारा येथून १३ एम.एम.३ / वर्ष पाणी मिळेल. उर्वरित पाणी ओझर खेड धरण येथून ७ एम.एम. ३ / वर्ष या प्रमाणे उपलब्ध होईल.

**इंधन:** महागूज कोलायरीज लि. यांनी त्यांचे पत्र दि. १८ मे २०११ नुसार मच्छाकाटा कोळसा खाण येथून या प्रकल्पाला कोळशा पुरवठ्याचे आश्वासन दिले.

**पर्यावरणाचा निपटारा:** पर्यावरणाविषयी जाहीर सुनावणी दि.२८/०२/२०१२ रोजी पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली यांना पत्र क्र.४४१ दि.१८/०५/२०१२ नुसार पर्यावरणाचा निपटारा सादर केला.

इ.ए.सी यांनी प्रकल्पासाठी इ.सी.ची शिफारस केली आहे. इ.ए.सी. यांच्या सहा अटींची पूर्तता पर्यावरण व वनमंत्रालयाला दि.१६/०८/२०१२ रोजी सादर केली व इ.आय.ए.चा अहवालही या मंत्रालयाला सादर केला.

भुसावळ औष्णिक वीज केंद्र (१×६०० मे.वॅ.) यासाठी इ.पी.सी. आधारे निविदा आमंत्रणाची सूचना दि. ०५/११/२०११ रोजी दिली. निविदा विक्री दि.२६/०३/२०१२ पर्यंत, बोली सादर करणे व पाकीट क्र.१ उघडण्याची तारीख दि.२०/११/२०१२ ठरली.

महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पाच्या कार्यवाहीस शासन निर्णय क्र. प्रकल्प - २०१० / प्र.क्र.३ / ऊर्जा - ४ दि.०५/१०/२०१० नुसार मंजुरी दिली.

**३. नाशिक औष्णिक विद्युत केंद्र युनीट ६ (१ × ६६० मे.वॅ.):**

**जमीन:** महानिर्मितीच्या ताब्यातील जमीनीचे योग्य समायोजन करून हा प्रकल्प स्थापण्यासाठी जमीन उपलब्ध केली जाईल.

**पाणी:** जल संसाधन विभागाने त्यांचे पत्र दि.१२ जाने.२०११ अन्वये जादा ६.५ एम.एम.३/ प्रतीवर्ष एवढे पाणी राखून ठेवण्यास मंजुरी दिली.

**इंधन:** महागूजने त्यांचे पत्र दि.१८/०५/२०११ नुसार महानदी कोळसा खाणीचा कोळसा पुरविण्याचे आश्वासन दिले आहे.

**पर्यावरणाचा निपटारा:** पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून संदर्भाच्या अटी दि.०९/०६/२०११ रोजी मिळाल्या पर्यावरणाच्या प्रभावाचे मूल्यमापनाचा अभ्यास करण्यात आला. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमती देण्यासाठी अर्ज सादर केला.

महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पाच्या कार्यवाहीस शासन निर्णय क्र. प्रकल्प - २०११ / प्र.क्र.३१३ / ऊर्जा - ४ दि.२९/१२/२०११ अन्वये मंजुरी दिली आहे.

**४. पारस औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प युनीट - ५ (१ × २५० मे.वॅ.)**

पारस येथे एक कोळसा आधारीत २५० मे.वॅ. क्षमतेचे अति महत्त्वाचे युनीट स्थापन करण्याची योजना आहे.

**जमीन:** या प्रकल्पासाठी जमीन संपादन केली आहे.

**पाणी:** लोअर मून बॅरेज येथून प्रकल्पासाठी पाणी उपलब्ध आहे.

**इंधन:** महागूजने त्यांचे पत्र दि. १८ मे २०११ नुसार या प्रकल्पास ‘महानदी’ खाणीतून कोळसा देण्याचे आश्वासन दिले आहे.

**पर्यावरण निपटारा:** पर्यावरण व वनमंत्रालय, भारत सरकार यांच्या संदर्भाच्या अटी वेबसाईटवर दि.०७/०९/२०१२ रोजी दर्शविण्यात आल्या आहेत. अन्य कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

या प्रकल्पाच्या मंजुरीसाठी मंत्री मंडळास सादर करावयाची टिपणी मा.सचिव, महाराष्ट्र शासन यांना ०२/०७/२०१२ रोजी सादर केली.

**५. लातूर कोळसा आधारीत युनीट १ व २ (२ × ६६० मे.वॅ.) किंवा वायू आधारीत सीसीपीपी गट - १ व २ (२ × ७५० मे.वॅ.):**

महानिर्मिती कंपनीने मे. भेल सोबत सामंजस्याचा करार दि. १२.०८.०९ रोजी केला त्यानुसार लातूर येथे २ × ६६० मे.वॅ. क्षमतेचे महावीज निर्मिती केंद्र किंवा १५०० मे.वॅ. चे वायू आधारीत केंद्र स्थापन करण्यासाठी मे.भेल सोबत एक संयुक्त उपक्रम कंपनी सुरू करण्याचा करार दि. ११/११/२०१० रोजी केला. लातूर पॉवर कंपनी लि. यास कंपनी रजिस्ट्रार मुंबई यांनी कंपनी अधिनियमानुसार प्रमाण पत्र दि.०६/०४/२०११ रोजी दिले. मुख्य प्रवर्तन अधिकारी, यांची नियुक्त करण्यात आली.

१५०० मे.वॅ.वायू आधारीत प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे. संपादन करावयाच्या जमिनीसाठीच्या दरांना विभागीय आयुक्तांनी संमती दिली आहे.

इंधनाच्या जोडणीसाठी वाणिज्य आणि पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयांसोबत काम प्रगतीपथावर आहे.

महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पास पत्र क्र. प्रकल्प - ०६१० / प्र.क्र.१९४ / ऊर्जा - ४ दि.२५/१०/२०१० नुसार २ × ६६० मे.वॅ. कोळसा आधारित किंवा १५०० मे.वॅ. वायू आधारीत प्रकल्प लातूर किंवा अन्य योग्य जागी सुरू करण्यास मंजूरी दिली आहे.

**६. धोपावे औ.वि.केंद्र प्रकल्प युनीट १ ते ३ (३ × ६६० मे.वॅ.):**

हा प्रकल्प संयुक्त साहस रचनेद्वारे अंमलात आणावयाचा प्रस्ताव आहे.

**जमीन:** जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना ६०० हेक्टर जमीन संपादन करून देण्याचा प्रस्ताव सादर केला. जमीन संपादनाचे कार्य प्रगतीपथावर आहे.

**पाणी:** या प्रकल्पास लागणारे एकूण ८० एम.एम.३ पाणी कोयना टेलरेस मधून मिळेल.

**इंधन:** मच्छाकाटा खाणीतून या प्रकल्पासाठी रॅम्प-अप केलेला कोळसा मिळेल.

**पर्यावरण व वनमंत्रालयाकडून निपटारा:** भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने पर्यावरणाच्या प्रभावाचे मूल्यमापनाचा अभ्यास करण्याच्या संदर्भाच्या अटी त्यांच्यासोबत झालेल्या ०६/०९/२०१० रोजीच्या बैठकीत दिला. त्याचे जमीनीवरील मूल्यमापन पूर्ण केले. एन.आय्.ओ. मुंबई यांचेकडून सागरी पर्यावरण प्रभावाच्या मूल्यमापनाच्या अहवालाचे दोन भाग दि.०७/०९/२०१२ रोजी मिळाले.

संयुक्त साहसासाठी भागीदार मिळविण्याच्या कामात सल्ला देण्यासाठी मे.ए.एक्स.वाय्. के.एन.ओ. कॅपीटल सर्विसेस नागपूर यांना दि.३०/११/२०११ रोजी पत्र देऊन धोपावे व दोंडायाच्या प्रकल्पाचे संयुक्त पत्र देण्यात आले.

महाराष्ट्र शासनास दि.१३/१०/२०१० रोजी सदर संयुक्त साहस रचना करणे, मालकी व समभागांचा सहभाग यांच्या तत्त्वतः मंजूरीसाठी पत्र दिले. याबाबत पत्र व्यवहार चालू आहे.

**७. दोंडायचा औ.वि.केंद्र युनीट -** १, २, ३, ४ व ५ (५ × ६६० मे.वॅ.):

**जमीन:** या ५ × ६६० मे.वॅ. प्रकल्पासाठी एकूण ९४२.१६ हेक्टर जमीन लागेल जमीन संपादनाचे काम प्रगतीपथावर आहे.

**पाणी:** या प्रकल्पातील २ × ६६० मे.वॅ. (टप्पा - १) यासाठी तापी नदीवरील निम्न तापी प्रकल्पातून ४० एम.एम.३ पाणी राखून ठेवण्यास जल संसाधन विभागाने (सामान्यतः) मंजुरी दिली आहे. टी.आय्. डी.सी. यांनी कळविले आहे की, ३ × ६६० मे.वॅ. (टप्पा-२) प्रकल्पासाठी आणखी ४५ एम.एम.३ पाणी निम्न तापी प्रकल्पातून मिळू शकेल.

**इंधन:** यूनीट १ व २ (टप्पा - १) यासाठी चेंदीपाडा कोळसा खाण ओरीसा येथून कोळसा मिळेल. यु. सी.एम. (उत्तरप्रदेश - छत्तीस गड - महाराष्ट्र) या संयुक्त साहस कंपनी द्वारा कोळशाची खाण देण्यात आली आहे. त्यांनी या खाणीच्या विकासासाठी एम.डी.ओ. नियुक्त केला आहे. युनीट क्र. ३, ४ व ५ (टप्पा - २) यासाठी कोळसा ओरीसाकडील मच्छाकाटा खाणीतून मिळेल. मात्र जर धोपावे ३ × ६६० मे.वॅ. प्रकल्पास महाराष्ट्र शासनाने मंजूरी दिली तर या कोळसा खाणीतील कोळसा धोपावे प्रकल्पाकडे वळवावा लागेल आणि दोंडायचे टप्पा - २ प्रकल्पासाठी ओरीसातील महानदी खाणीतून कोळसा उपलब्ध केला जाईल. महानदी खाणीतील कोळसा मिळण्यास विलंब झाल्यास उपलब्ध जोडणीतून कोळसा दिला जाईल.

**पर्यावरण व वनमंत्रालयाचा निपटारा:** भारत सरकारच्या या मंत्रालयाच्या अटींचा संदर्भ दि.०५/०५/२०११ रोजी मिळाला. पर्यावरण प्रभावाच्या मूल्यमापनाचा अभ्यास चालू आहे.

या प्रकल्पाच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र शासनास प्रकरण सादर केले आहे. पत्र व्यवहाराने पाठपुरावा चालू आहे.

**८. कानपा (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) नजीक कोळसा आधारीत औष्णीक प्रकल्प (२ × ६६० मे.वॅ.):**

या प्रकल्पाची अंमलबजावणी संयुक्त साहस रचनेमार्फत करण्याचा प्रस्ताव आहे. जमीन संपादनाबाबत प्रारंभिक कार्य सुरू झाले आहे. या प्रकल्पास ४० एम.एम.३ पाणी लागेल त्याबाबत जल विभागाकडे प्रस्ताव दिला आहे. दीर्घ मुदतीचा कोळसा पुरवठा करण्याबाबत कोळसा मंत्रालय / सी.ई.ए. याकडे पाठपुरावा चालू आहे.

**९. मेंढकी (ता.ब्रह्मपूरी, जि.चंद्रपूर) येथे कोळसा आधारित औष्णिक वीज प्रकल्प (२ × ६६० मे.वॅ.):**

या प्रकल्पाची अंमलबजावणी संयुक्त साहस रचनेमार्फत करण्याचा प्रस्ताव आहे. जमीन संपादनाबाबत प्रारंभिक कार्य सुरू आहे.

या प्रकल्पास ४० एम.एम.३ पाणी लागेल. त्याबाबत जल विभागाकडे प्रस्ताव दिला आहे. कोळसा पुरवठा करण्याबाबत कोळसा मंत्रालय / सी.ई.ए. यांकडे पाठपुरावा चालु आहे.

**१०. मनोरा (ता.तिरोडा, जि.गोंदिया) नजीक कोळसा आधारीत औष्णिक वीज प्रकल्प (२ × ६६० मे.वॅ.):**

हा प्रकल्प गोंदिया जिल्ह्यातील मनोरा जवळ महानिर्मिती कंपनीतर्फे राबविण्याचा प्रस्ताव आहे. जमीन संपादनाचे प्रारंभिक कार्य सुरू आहे. या प्रकल्पास ४० एम.एम.३ पाणी लागेल. त्याचा प्रस्ताव जलविभागाला दिला आहे. कोळसा पुरवठ्याच्या दीर्घ मुदतीच्या जोडणीसाठी कोळसा मंत्रालय / सी.ई.ए. यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

## सौर ऊर्जेची निर्मिती

सौर ऊर्जा निर्मिती विभाग (पूर्वीचे नांव कार्पोरेट नियोजन विभाग) यांचेकडे राज्यातील पहिला मेगावॅट स्तरावरील सौर पी.व्ही. वीज प्रकल्प विकसीत करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. १ मेगावॅट पी. सोलर पी.व्ही.प्रकल्प एम.एन.आर.इ. यांनी दिलेल्या वेळेच्या मर्यादेत सुरू करून, वर्ष २०११-१२ मध्ये १.५२० दशलक्ष युनीट विजेची निर्मिती झाली.

सौर वीज निर्मिती निसर्गाच्या लहरीवर आणि जागेवर सूर्याच्या पूरेश्या उपलब्धतेवर अवलंबून असते. हा प्रकल्प संकल्पित वीज निर्मितीच्या अंदाजित क्षमतेच्या ९० टक्के करील अशी अपेक्षा आहे. संकल्पित प्रकल्प १.४२५ द.ल.यु. वीज निर्मिती करील अशी अपेक्षा असताना वर्ष २०११-१२ मधील १.५२० द.ल.यू. वीज निर्मिती महानिर्मितीच्या अपेक्षेपेक्षा जास्त आहे.

याशिवाय अन्य दोन ४ एम.डब्ल्यू.पी. ची युनीटस् (२ एम.डब्ल्यू.पी. क्रिस्टलाईन तंत्रज्ञानावर २ एम.डब्ल्यू.पी. तलम फिल्म तंत्रज्ञानावर आधारीत) अनुक्रमे दि. १८/१०/२०१२ रोजी व दि.१२/०२/२०१२ रोजी वीज जाळ्या सोबत संकलित झाली. वर्ष २०११-१२ मध्ये त्यांची निर्मिती अशी :

अ) २ एम.डब्ल्यू.पी. - किस्टलाईन तंत्रज्ञानावर आधारीत ०.३३९ द.ल.यू.

ब) २ एम.डब्ल्यू.पी. - तलम फिल्म तंत्रज्ञानावर आधारीत ०.३९८ द.ल.यू.

महानिर्मितीच्या पूनर्वापर योग्य वीज निर्मितीच्या पद्धतीच्या अंमलबजावणीनुसार एक सौर - पी.व्ही. वीज प्रकल्प (१२५ एम.डब्ल्यू.पी.) साक्री जि. धुळे येथे विकसीत केला जात आहे. त्यासाठी जमीनीतील झुडपे काढण्याचे काम पूर्ण झाले. वेगवेगळ्या ठिकाणी स्पर्धात्मक दरात जमीनी मिळवून तेथे सौर वीज प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी हा विभाग सर्वोतपरी प्रयत्न करीत आहे.

## नव्या प्रकल्पांसाठी वीत्त पुरवठा

सर्व नियोजित क्षमता वाढीच्या प्रकल्पांना वित्त पुरवठा ८०:२० या समभागाच्या गुणोत्तरात केला जातो. विस्तार कामातील समभागाच्या वर्गणीसाठी आपली कंपनी उत्पन्नाची संसाधने वापरणार आहे. प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ८० टक्के खर्चाचे तरतूद वित्तीय संस्था व बँका यांच्यामार्फत होईल उर्वरित २० टक्के समभाग प्रामुख्याने महाराष्ट्र शासनाद्वारे मिळतील.

## इंधनाची उपलब्धता

### १. महानिर्मितीची कोळशाची गरज:

महानिर्मितीची औष्णिक वीज निर्मितीची स्थापित क्षमता वर्ष २०१२-१३ मध्ये ७८९० मे.वॅ. आहे. महानिर्मिती कोळसा अंतर्गत पुरवठा, इ. लिलाव आणि आयता यामार्फत मिळविते.

### २. इंधन प्राप्तीची करार:

महानिर्मती कंपनीने कोळशांच्या कंपन्या सोबत वार्षिक संख्येने कोळसा प्राप्तीचे करार खालीप्रमाणे केले आहेत.

| कोळसा कंपनी | वार्षिक संख्या कंत्राट एम.एम.टी.पी.ए. मध्ये | कराराची तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| डब्ल्यू.सी.एल. | २२.७०१ | २१.११.२००९ | कार्यवाही दि.०१/०४/२००९ पासून सुरू असून ती २० वर्षे चालू राहील आणि सदर वार्षिक कंत्राटी संख्या व इतर तरतुदींचा आढावा दर पाच वर्षांनी घेतला जाईल. |
| एस.इ.सी.एल. | ६.०२७ | २६.०६.२००९ | |
| एम.सी.एल. | ६.१७२ | २६.०६.२००९ | |
| एस.सी.सी.एल. | २.२६० | ०५.०३.२००९ | |
| एम.सी.एल. | ६.१४८ | | सामंजस्याचा करार पारस-४, परळी - ७ केपीकेडी - ५ व भुसावळ - ४ व ५ साठी |
| आयात कोळसा | १.९५९ | | ऑक्टो.२०१२ मध्ये करार केला |
| **एकूण** | **४५.२६७** | | |

**३. आयात कोळसा:** महानिर्मितीने १.९५९ एम.एम.टी. सब बीट्यूमिनियस आयात कोळसा (जी.सी.व्ही. - ४६०० के. कॅल. / केजी) भुसावळ, परळी व खापरखेडा औ.वि.केंद्रासाठी घेण्यासाठी मागणी नोंदविली. चंद्रपूर, खापरखेडा व नासिक औ.वि.केंद्रासाठी बिट्यमिनियस आयात कोळसा (जी.सी.व्ही. ६५०० के.कॅल. /केजी) प्रापणासाठी निविदा प्रक्रीया चालू आहे.

सध्या परळी केंद्रात व वरणगाव येथे पाण्याची टंचाई असून रेल्वे सायडींगच्या समस्यांचा त्रास भुसावळ केंद्राला होत आहे. महानिर्मिती कंपनीने परळी व भुसावळ केंद्राचा आयात कोळसा चंद्रपूर केंद्राकडे वळविला आहे. सब-बिटीम्युनियस आयात कोळसा पुरवटा होत असल्याने भुसावळ येथे प्रती दिवशी १.५ रेक्स असा जादा रेक्स लागतात खापरखेडा

१.० रेक / प्रती दिवस आणि चंद्रपूर येथे १.५ रेक / प्रती दिवस लागतात. सध्याची वीज निर्मिती ४५५० मे.वॅ. वरून ५४०० मे.वॅ. पर्यंत वाढेल.

**४. विविध कोळसा कंपन्याच्या पुरवठ्यात घट:**

सी.आय.एल. च्या उपकंपन्यांच्या म्हणजेच डब्ल्यू.सी.एल., एम.सी.एल व एस.इ.सी.एल. यांच्याकडून होणाऱ्या कोळसा पुरवठ्यात एकूण २५ टक्के घट होत आहे. वित्तीयवर्ष २०११ - १२ मध्ये सुमारे २५.७५ टक्के मालाची घट झाली. कोळसा कंपन्या निहाय पुरवठा व घट यांची वजा २०११-१२ ची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.:

| कोळसा कंपनी | वार्षिक संख्या कंत्राट (एम.एम.टी.) | प्राप्ती (एम.एम.टी.) | घट (एम.एम.टी.) | घटीची टक्केवार % |
|---|---|---|---|---|
| डब्ल्यू.सी.एल. | २२.७०१ | १७.४३३ | ५.२६८ | २३.२० |
| एम.सी.एल. | ८.८५२ | ४.५३३ | ४.३१९ | ४८.७९ |
| एस.ई.सी.एल. | ६.०२७ | ५.७४८ | ०.२७९ | ४.६३ |
| एस.सी.सी.एल. | २.२६ | १.८६५ | ०.३९५ | १७.४७ |
| **एकूण** | **३९.८४** | **२९.५७९** | **१०.२६१** | **२५.७५** |

वर्ष २०११-१२ मध्ये ३९.८४ एम.एम.टी. कोळसा मिळण्याऐवजी २९.५७ एम.एम.टी. एवढाच मिळाला. आपल्या एकूण गरजेच्या ७४.२५ टक्के कोळसा मिळाला. २५.७५ टक्के घट (१०.२६ एम.एम.टी.) झाली व ती घट पुढे एप्रिल - सप्टेंबर २०१२ मध्ये २६.६७ टक्के झाली (या वर्ष - २०१२ - १३ मध्ये नवीन १५०० मे.वॅ. क्षमतेची भर पडल्यामुळे).

महानिर्मिती या विषयी संबंधित कोळसा कंपन्यांकडे व रेल्वेकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहे व पुरवठा वाढविण्याचा आग्रह धरीत आहे.

**५. महानिर्मितीच्या प्रकल्पासाठी केलेल्या इंधन पुरवठा / सामंजस्य कराराची स्थिती:**

कोळसा मंत्रालय, भारत सरकार, यांनी परळी - ७ (२५० मे.वॅ.), पारस - ४ (२५० मे.वॅ.) खापरखेडा - ५ (५०० मे.वॅ.) आणि भुसावळ ४ व ५ (२ × ५०० मे.वॅ.) या प्रकल्पांसाठी कोळशासाठी दीर्घ मुदतीच्या जोडणी ('एफ' श्रेणी) महानदी कोलफिल्डस् लिमिटेड येथून मंजूर केल्या आहेत.

कोल इंडिया लि. (सीआयएल) यांच्या सूचनेनुसार, महानिर्मितीने परळी - ७, पारस - ४, खापरखेडा - ५ व भुसावळ ४ व ५ या युनीट्स साठी कोळसा पुरवठ्यासाठी सामंजस्याचे करार एम.सी.एल. सोबत खालीलप्रमाणे केले.

| प्रकल्प / युनीटस्चे नांव | क्षमता (एम.एस.सी.) | संख्या (एम.एम.टी. पी.ए.) | २०१२-१३ साठी केलेल्या सामंजस्य करारावी |
|---|---|---|---|
| परळी - ७ | २५० | १.२०४ | ०.८८ एम.एम.टी. |
| पारस - ४ | २५० | १.२०४ | ०.८८ एम.एम.टी. |
| खापरखेडा - ५ | ५०० | २.३१२ | १.६१८४ एम.एम.टी. |
| भुसावळ - ४ | ५०० | २.३१२ | १.३८७२ एम.एम.टी. |
| भुसावळ - ५ | ५०० | २.३१२ | १.३८७२ एम.एम.टी. |

कोल इंडिया लि. ने १ एप्रिल, २००९ व ३१ मार्च २०१५ दरम्यान कार्यान्वित झालेल्या वीज निर्मिती कॅडसाठी कंत्राटाच्या वार्षिक संस्थेच्या ८० टक्के ड्रिगर लेव्हल असलेला सुधारीत एफ एस ९ वितरीत केला. या एफ एस ९ च्या मसुद्या नुसार या देशांतर्गत कोळशाचा पुरवठा वर्ष २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ दरम्यान कंत्राटातील संख्येपेक्षा ६५ टक्क्याने, वर्ष २०१४-१५ मध्ये ७० टक्क्याने आणि वर्ष २०१५-१६ मध्ये ७५ टक्क्याने उपलब्धतेनुसार वाढू शकेल. उर्वरित कोळसा आयातीद्वारे पुरविण्यात येईल.

**६. महानिर्मिती कंपनीला दिलेल्या कोळसा खाणी:**

- कोळसा मंत्रालयाने ओरिसा मधील मच्छाकाटा व महानदी कोळसाखाणी महानिर्मिती व गुजरात राज्य वीज कंपनी लि. यांना संयुक्तपणे दिले आहेत. या खाणीतील कोळसा महानिर्मिती व जी.एस.इ.सी.एल. अनुक्रमे ६०:४० या गुणोत्तरात वाढून घेतली.

- मच्छाकाटा खाणीतील कोळसा कोराडी (३ × ६६० मे.वॅ.), चंद्रपूर (२ × ५०० मे.वॅ.), धोपावे (३ × ६६० मे.वॅ.), परळी - ८ (बदल) (२५० मे.वॅ.) आणि भुसावळ - ६ (बदली (६६० मे.वॅ.) या नव्या केंद्रात वापरला जाईल.

- महानदीचा कोळसा दोंडायचा टप्पा - २, (३ × ६६० मे.वॅ.), पारस बदल (२५० मे.वॅ.) व नाशिक (१ × ६६० मे.)वॅ. या भविष्यातील प्रकल्पात वापरला पाहिजे.

- चंदीपाडा - १ व चंदीपाडा - २ या खाणी अनुक्रमे महानिर्मिती, छत्तीसगड खनीज विकास महामंडळ व ३.५ राज्य निगम लि. यांना संयुक्तपणे दिल्या आहेत. महानिर्मितीला २९४.५ एम.एम.टी. कोळसा येथून मिळेल. तो दोंडायच्या येथील भावी वीजकेंद्राच्या १ ल्या टप्प्यात (२ × ६६० मे.वॅ.) या केंद्रासाठी वापरला जाईल.

- महानिर्मितीच्या क्षमतेत ५८७० मे.वॅ.ची भर पडणार असून ती मच्छाकाटा या ओरिसा खाणीशी संलग्न केली आहे. यापैकी ३२३० मे.वॅ. एवढ्या क्षमतेसाठी चंद्रपूर (२ × ५०० मे.वॅ.) कोराडी (३ × ६६० मे.वॅ.) आणि परळी २५० मे.वॅ. अशा विविध ठिकाणी बांधकामे आदि कामे सुरू झाली आहेत.

- ओरीसा सरकारच्या पोलाद व खाण विभागाकडून जमीन संपादनास प्रशासकीय मंजूरी देण्यात विलंब झाल्यामुळे मच्छकाटा कोळसा खाणीचे विकासाचे कामात उशीर झाली. सद्या एक वर्षाचा विलंब झाला तो आणखी वाटेल असे भय आहे. त्यामुळे प्रत्यक्ष कोळसा उत्पादन सुरू होण्यास विलंब होईल.

- वरील अडथळे दूर करण्यासाठी तसेच मच्छाकाटा येथे कोळसा उत्पादनास विलंब होत असल्याने महानिर्मितीने केंद्रिय वीज प्राधिकरणाला मच्छकाटा संलग्न प्रकल्पांसाठी पर्यायी जोड देण्याची विनंती केली आहे. यासाठी आवश्यक ती माहिती व सुधारीत वेळापत्रक सीइएला सादर केले आहे हे प्रकरण विचाराधीन आहे.

**७. कोळसा मिळविण्याचे विविध पर्यायः**

कोळसाच्या पुरवठ्यात पडणारी घट बुजविण्यासाठी महानिर्मिती कंपनीला खालील पर्यायांच्या शक्यतांचा विचार करावा लागणार आहे.

- डब्ल्यू.सी.एल. चे अधिक किंमतीच्या प्रकल्प महानिर्मितीच्या वीजनिर्मिती केंद्राच्या सानिध्यात आहेत. त्यासाठी या अधिक किंमतीच्या खाणी कोल कोळसा पुरवठ्याचे करार कारावे लागतील. त्यातून अधिक चांगली इंधन सुरक्षा हमी मिळेल.

- महानिर्मिती कंपनीला इंडोनेशिया, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या देशातील खाणी / ऊर्जा मत्ता संपादन करावा लागेल किंवा तेथील खाण व्यावसायीकांशी दीर्घ मुदतीचे करार करावे लागतील.

- **गार पालमा क्षेत्र २ येथील कोळसा -** कोळसा मंत्रालयाने गार पालमा सेक्टर - २ येथील कोळसा खाण तामिळनाडू राज्य विद्युत मंडळ व मे.महाराष्ट्र राज्य खाणा महामंडळ लि. यांना संयुक्तपणे दिली आहे. वितरणाच्या पत्रानुसार एम.एस.एम.सी.एल. च्या वाट्याला १७५ एम.टी. कोळसा उपलब्ध होईल. येथील राखीव साठ्यातील खाण काम करण्यास योग्य कोळसा १२०-१४० दशलक्ष टन व खाणीचे आयुष्य ३० वर्षे असे हिशेबात धरल्यास तेथे ४.४ एम.टी.पी.ए. कोळसा मिळेल. एम.एस.एम.सी.एल. यांनी आपला वाटा महानिर्मितीला गारे पाल्या सेक्टर - २ येथून अधिक किंमतीला खरेदी करण्याची तयारी दर्शविली आहे. महानिर्मितीनेही तो साठा वीज निर्मितीच्या अंतीम टप्प्यात वापरण्यासाठी तयारी दाखविली आहे. महाराष्ट्र शासनाचे मा.प्रधान सचिव (उद्योग) यांना स्वीकाराची संमती कळविण्यात आली आहे.

- **महाराष्ट्रातील कोळसा खाणी -** राज्य शासनाने नांदोरी, कोंडा - हरडोली, वणी - अलेसूर, येकोना १ व २, महाडोली येवती या कोळसा खाणींचे (एकूण साठा - २३३ एम.एम.टी. या दराने) आरक्षणाचे प्रस्ताव रद्द करण्याचे ठरविले आहे. हे साठा महानिर्मिती कंपनीला देण्यात येतील. यासाठी कोळसा मंत्रालयाकडे सातत्याने पाठपूरावा करण्यात येत आहे. हे साठे महानिर्मितीस मिळवित व इंधन सुरक्षा लाभावी हा हेतू आहे.

- डब्ल्यू.सी.एल., एस.इ.सी.एल., एस.सी.सी.एल. व एम.सी.एल. येथील कोळसा इलेक्ट्रॉनिक लिलावातून किंवा तशी बोली लावून मिळविणे.

**८. विद्यमान जी.टी.पी.एस. उरण प्रकल्पास वायूचा पुरवठाः**

- महानिर्मितीच्या उरण येथील वायू औ.वि.केंद्राची क्षमता ६७२ मे.वॅ.आहे. विद्यमान उरण वीज केंद्रासाठी ३.५ एम.एम.एस.सी.एम. या दराने वायूची गरज आहे. महानिर्मितीने मे.जी.ए.आय.एल. यांचे सोबत दीर्घ मुदतीचा वायू पुरवठा व खरेदी करार (जी.एस.पी.ए.) केला असून त्यानुसार विद्यमान केंद्राला सरकारी मंजुरीत दराने ३.५ एम.एम.एस.सी.एम.डी. वायू पुरविला जाणे अपेक्षित आहे. मात्र मे.जी.ए.आय.एल. सरासरी २.३ एम.एम.एस. सी.एम.डी. एवढाच वायूचा पुरवठा करते.

- वायूची टंचाई कमी निर्माण करण्यासाठी महानिर्मितीने जी.एस.पी.ए. करार मे.आर.आय.एल. व मे.एन.आय्.के. ओ. यांच्यासोबत के.जी.बेसीन येथील वाय.१.२ एम.एम.एस.सी.एम.डी. एवढा सरकारी दराने मिळविण्यासाठी केले आहेत. हा वायू आर.आय.एल. केली बेसीन येथून उरण येथे आणण्यासाठी मे.आर.जी.टी.आय.एल. आणि मे. जी.ए.आय.एल. यांच्यासोबत वाहतूकीचे करार (जी.टी.ए.) केले आहेत.

- ए.पी.एम. व आर.आय.एल. येथे उत्पादनाची पातळी कमी झाल्याने तेथील वायूचा पुरवठा गेल्या काही महिन्यांपासून कमी झाला आहे. मे.जी.ए.आय.एल. यांच्याकडून होणारा नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यात ही तफावत पडत आहे. मो.१.९० ते २.१० एम.एम.एस.सी.एम.डी अशा प्रमाणात कमी जास्त होतो. कारण त्याची प्राप्ती ओ.एन.जी.सी. कडून होणाऱ्या उपलब्धतेनुसार कमी जास्त होते. मे.आय.आय.एल. यांच्याकडील के.जी. डी. - ६ खाडीतील वायूचा पुरवठाही ०.५५ ते ०.६० एम.एम.एस.सी.एम.डी. असा कमी जास्त होते. या कमतरतेमुळे वीज निर्मितीमध्ये सरासरी १५० मे.वॅ. हानी होते.

## मानव संसाधन व्यवस्थापना

कर्मचारी हे कुठल्याही संघटनेची सर्वांत महत्त्वाची व मौल्यवान मत्ता असते. त्याची सर्पतता, संशोधनवृत्ती व कामगिरी यात सर्वोत्कृष्ट दर्जाची वाढ व्हावी यासाठी अनुकूल पर्यावरण आवश्यक असते. आपल्या कंपनीने गुणवत्ताधारी, प्रशिक्षित व बहूविध ज्ञानशाखांतील मानवी भांडवल - आपल्या कर्मचाऱ्यांच्या रुपात विकसीत करण्याचे ध्येय ठेवले असून त्यासाठी प्रयत्न केले जातात.

आव्हानात्मक कामे घेण्यास सज्ज असणारे कर्मचारी कंपनीकडे असतील. सर्वोत्कृष्ट संघटना य ध्येय प्राप्ती मानवी संसाधन करून ''लोकांना अग्रक्रम'' देऊन होणार आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांच्या शक्तीचा सूयोग्य वापर व्यावसायिक योजना पार पाडतांना केला जातो.

## औद्योगिक संबंध

या वर्षभरात सुद्धा कंपनीचे कर्मचाऱ्यांसोबतचे नाते मैत्रीचे व सलोख्याचे होते. कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाचे स्थिती व कल्याण अशा क्षेत्रात सहभागी होण्यास उत्तेजन देण्यात आले. प्रकल्पातील कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधींसाठी सर्व थरात कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यात त्यांना कंपनीचे बदलती औद्योगिक स्थिती, जोखीम, आव्हाने व संधी यांची माहिती देण्यात आली.

सर्वसाधारणपणे वर्ष भरात औद्योगिक संबंध शांततेचे तसेच सलोख्याचे व परस्परांवर विश्वासाचे होते. नवीन वेतन सुधारणेचा करार व्यवस्थापन व कर्मचारी संघटनामध्ये झाला असून तो एप्रिल २००८ पासून लागू होईल.

कोणत्याही कर्मचाऱ्यास प्रतीवर्षास ₹२,४००,०००/- किंवा ₹२००,०००/- प्रतिमाह यापेक्षा जास्त वेतन यावर्षी मिळालेले नाही. सदर माहिती, कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २१७ (२ए), ज्याचे सहवाचन कंपनीज (कर्मचाऱ्यांचा तपशील) नियमावली १९७५ या सोबत होते, यानुसार आवश्यक असणारी माहिती येथे देण्यात येत आहे.

## अनुसूचीत जाती जमाती व इमाव यांचे आरक्षण

आपली कंपनी महाराष्ट्र शासनाकडून अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय यांच्यासाठीच्या राखीव पदासंबंधी वेळोवेळी येणाऱ्या सूचनाचे तंतोतंत पालन करीत आहे.

## प्रशिक्षण व विकास

आपली कंपनी देशातील सर्वोत्तम वीजनिर्मिती कंपनी म्हणून नावाजली जावी असे कंपनीचे ध्येय आहे. त्याला अनुसरून आपल्या कर्मचाऱ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी कंपनी सुविधा पुरवित आहे. कंपनीची दोन प्रशिक्षण केंद्रे कोराडी व नाशिक येथे असून तेथे कंपनीत प्रवेश स्तरावरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण तसेच इतर प्रशिक्षण देण्यात येते. वीज निर्मिती केंद्रातील कार्यक्रम व देखभाल या संबंधीचे विविध विकास कार्यक्रम आयोजिले जातात. याशिवाय गरजेनुसार संचालक व सुव्यवस्था, व्यवस्थापन विकास, औद्योगिक सुरक्षा, प्रकल्प व्यवस्थापन, वर्तणूकशास्त्र या विषयातील वेगवेगळे दृष्टीकोन समावेश असलेले प्रशिक्षण कार्यक्रम अन्य संस्था म्हणजे ''यशदा'' पूणे, इ.एस.सी.आय. - हैद्राबाद, विविध आय.आय.टी. भेल, जागतिक बँक एन.पी.टी.आय. आदि सोबत आयोजिले जातात.

## मराठी भाषेचा वापर

आपली कंपनी रोजच्या कामकाजात तसेच शासनाच्या पत्रव्यवहारात मराठीचा वापर करते. वार्षिक अहवाल व अन्य सांविधिक अहवाल मराठीत तयार केले जातात.

## पर्यावरण

महानिर्मितीने हवा, पाणी व माती यांचे पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी कसोशिने प्रयत्न चालविले आहेत ते खालीलप्रमाणे

- **वृक्षारोपण व हरीत पट्टा विकास**

  महानिर्मितीने आपल्या विविध वीज केंद्रात हरीत पट्टा विकासाचा कार्यक्रम राबविला असून त्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली जाते व त्यांची निगा राखली जाते. दि.३१ मार्च २०१२ पर्यंत सर्व औष्णिक विद्युत केंद्रात एकूण २९.५ लाख झाडे लावण्यात आली.

- **उत्सर्जनाचे नियंत्रण**

  महानिर्मिती कंपनीचे उद्दिष्टे ठरवून, औष्णिक केंद्रातील धुराड्यातून होणाऱ्या उत्सर्जनाचे नियंत्रण करण्यासाठी खालील उपाय कृतीत आणले आहेत.

  - १७ जुन्या युनीटांसाठी एस.पी.एम. नियमांची पूर्तता करणाऱ्या इ.एस.पी.ची वाढ केली.
  - ९ जून्या युनीटांसाठी एस.पी.एम. नियमांनुसार अमोनिया इंजेक्शनच्या सह वायू नियंत्रण प्रणाली स्थापित केला. यानुसार कोरोडी यूनीट - ७, चंद्रपूर - युनीट १,२,३,४ खापरखेडा युनीट १ व २, भुसावळ युनीट - २ परळी युनीट - ५ येथील ए.एफ.जी.सी. प्रणाली कार्यान्वित झाली.
  - भूसावळ यूनीट ३, कोराडी युनीट - ७, नीशक युनीट ४,५ व परळी युनीट - ४ येथे उत्सर्जनाचे प्रमाण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरविल्याप्रमाणे ५० एम.जी. / एम.एम.३ असे असावे यासाठी या २१० मे. वॅ.च्या ५ युनीट्स साठी इ.एस.पी. रिट्रोफिटींग करण्याची शक्यता अजमावण्याचा अभ्यास करण्यासाठी मुख्य अभियंता (कार्ये) यांनी भेलकडे मागणीपत्र दिले.
  - कोराडी-६, चंद्रपूर १व२, परळी-३, भुसावळ २ व नाशिक २ या युनीटांकरिता नुतनीकरण व आधुनिकीकरणाचे प्रस्ताव तयार करण्यात येत आहेत.

- **परिसरातील हवेच्या दर्जाचे निरिक्षण**

  औष्णिक विद्युत केंद्र परिसता विविध जागेच्या हवेचा दर्जा एस.पी.एम. सल्फर ऑक्साईडचे व नायट्रोजन ऑक्साईडचे प्रकार या मापदंडानुसार नियमीतपणे वेळोवेळी तपासले जातात. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने विहीत केलेल्या मर्यादेत या मापदंडाचे मूल्य आहेत असे निरिक्षणात आढळले.

  सर्व वीज केंद्र परिसरात हवेच्या दर्जा दाखविणारी निरिक्षण केंद्रे स्थापित करण्यात येत आहेत. सध्या चंद्रपूर, कोरडी व भुसावळ येथे प्रत्येकी एक केंद्र उभारण्यात आले आहे.

- **पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा यांचे अंकेक्षण**

  वर्ष २०११-१२ साठी राष्ट्रीय सुरक्षा मंडळाने कंपनी पर्यावरण, सुरक्षा व आरोग्य धोरण तयार केले आहे.

  वर्ष २०११ व २०१२ मध्ये सेंट्रल लेबर इन्स्टिट्यूट या संस्थेने चंद्रपूर, कोराडी, खापरखेडा व भुसावळ केंद्राचे बाह्य सुरक्षा अंकेक्षण केले. महानिर्मितीच्या उर्वरित वीज केंद्रातही सुरक्षा अंकेक्षण करण्यात येत आहे.

- **राखेचा वापर**

  १. फ्लाय ॲश व तळ्यातील राख पाँड ॲश यांचा वापर सिमेंट, विटा, ॲसबेस्टास, खते व रस्त्याचे काठ यांच्या क्षेत्रात वाढला यासाठी महानिर्मितीने प्रयत्न चालू ठेवले आहेत.

| वर्ष | राख वापराची टक्केवारी % |
|---|---|
| २००७-०८ | ३०.६० |
| २००८-०९ | ४३.२३ |
| २००९-१० | ४९.७२ |
| २०१०-११ | ४७.२५ |
| २०११-१२ | ५५.३२ |

२. पारस केंद्रात दि.२७ फेब्रुवारी २०१२ रोजी 'फ्लाय ॲश - एक स्वस्त पर्यावरण स्नेही व टिकाऊ बांधकामाचे साधन' यावर चर्चासत्र झाले.

- **कारखान्यातून आकस्मित पदार्थाची प्रक्रीया**

महानिर्मिती कंपनीने वेगवेगळ्या केंद्रात उत्सर्जित प्रक्रीया केंद्रे कार्यान्वित केली आहेत व तेथे पदार्थांच्या पूनर्वापरासाठी प्रक्रीया केली जाते त्याची वार्षिक टक्केवारी अशी:

| | | |
|---|---|---|
| १. | भूसावळ | ३८.६५% |
| २. | चंद्रपूर | ६७.३५% |
| ३. | कोराडी | २३.९७% |
| ४. | खापरखेडा | ९५.१४% |
| ५. | नाशिक | ९५.२७% |
| ६. | परळी | ७७.२२% |
| ७. | पारस | ९३.२४% |

- **धोकादायक निकामी पदार्थाची विल्हेवाट**

निकामी पदार्थाच्या व्यवस्थापनासाठी महानिर्मिती कंपनीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रधिकृत केलेल्या संस्थासोबत करार केले आहे.

- **सी.डी.एम. प्रकल्प**

भविष्यात नवीन उभारणी होणारे वीज प्रकल्प सुपर क्रिटीकल अशा उच्चदर्जाच्या महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानावर आधारलेले आहेत. त्यात कोळसा वापर कमी होतो; त्यामुळे ग्रीन हाऊस गॅसेसचे उत्सर्जन कमी होते. या सुपर क्रिटीकल युनीट्ससाठी सी.डी.एम. लाभ घेण्यासाठी आपण नवे उपक्रम सुरू केले आहेत ते खालीलप्रमाणे:

१. कोराडीच्या ४ × १२० मे.वॅ. प्रकल्पाच्या जागी १ × ६६० मे.वॅ. चा बदली प्रकल्प उभारून सी.डी.एम. लाभ

मिळावा यासाठी www.untcc.com यावर पी.डी.डी. माहिती दर्शविण्यात आली. त्यासाठी मे.पी.डब्ल्यू.सी यांचे जागी नवीन सल्लागार नेमण्याची प्रक्रीया चालू आहे.

२. नाशिक युनीट ३(२१० मे.वॅ.) व कोराडी - ६ (२१० मे.वॅ.) या आर. ॲण्ड एम. प्रकल्पासाठी सी.डी.एम. सल्लागार म्हणून मे.डीलॉइट यांची नियुक्ती केली.

३. ३० जुलै २०११ रोजी कोराडी २ × ६०० मे.वॅ. आर. अँड एम. प्रकल्पांसाठी स्थानिक संबंधितांची बैठक घेतली.

४. दि.१२ ऑक्टोबर २०११ रोजी उरण १२२० मे.वॅ. वायू केंद्रासाठी स्थानिक संबंधितांची बैठक घेतली.

५. दि.१२ सप्टेंबर २०१२ रोजी नाशिक युनीट-३ (२१० मे.वॅ.) आर.अँड एम. प्रकल्पासाठी स्थानिक संबंधितांची बैठक घेतला.

## संचालक

श्री.व्ही.के.कानडे प्रधान सचिव (ऊर्जा), महाराष्ट्र शासन यांची कंपनीचे संचालक म्हणून दि.१८/११/२०११ पासून श्री.एस. जे.कुंटे यांच्याजागी नियुक्ती झाली.

कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक या पदावर श्री.आशिष शर्मा यांची नियुक्ती दि.०६/०७/२०१२ पासून श्री.सुब्रथ रथो यांचे जागी नियुक्ती झाली.

श्री.जी.जे.गिरासे हे संचालक (वित्त) या पदावर, त्यांची अन्य शासकीय विभागात बदली झाल्याने, दि.२१ मे २०१२ पासून नाहीत.

श्री.सी.एस.थोटवे यांचा कार्यकाल दि.२८/०८/२०१२ पासून संपल्याने ते संचालक (प्रकल्प) या पदावर नाहीत.

श्री.अरविंद सिंह याची कंपनीचे संचालक पदी दि.२९/०९/२०१२ पासून नियुक्ती झाली.

श्री एस.जे.कुटे, श्री.सुब्रत रथो व श्री.सी.एस.थोटवे व श्री.जी.जे.गिरासे यांनी कंपनीत असताना दिलेल्या मौल्यवान सेवेबद्दल मंडळ त्यांच्याबद्दल कृतज्ञता अहवालात नोंदवित आहे. तसेच सर्व नवीन नियुक्त पदाधिकाऱ्यांचे मंडळात स्वागत करीत आहेत.

## लेखा परिक्षण समिती

महानिर्मिती कंपनीत एका लेखा परिक्षण समितीची रचना करण्यात आली आहे. त्यात श्री.पी.व्ही.पागे (अध्यक्ष), श्री.जी.जे.गिरासे (संचालक वित्त), श्री.एम.जी.वाघमोडे संचालक (कार्ये) हे सदस्य आहेत. लेखापरिक्षण समितीच्या एकूण ६ बैठका झाल्या.

## संचालकाच्या जबाबदारीचे विवरण पत्र

कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २१७ (२एए) या संचालकाची जबाबदारीचे विवरण पत्र निश्चित करण्यात आले आहे.

ते असे -

१. वार्षिक लेखे तयार करताना लागू होणाऱ्या लेखा-मानकांचे पालन केले. काही प्रत्यक्ष फरक असल्यास त्याचे योग्य स्पष्टीकरण दिले.

२. निवड केलेली धोरणे सातत्याने वापरण्यात आली. निर्णय व अंदाज योग्यप्रकारे व सुज्ञपणे केले. त्याआधारे दि.३१ मार्च २०१२ रोजी कंपनीच्या व्यवसायाचे व अहवाल वर्षातील नफ्याचे योग्य चित्र दाखविण्यात आले.

३. संचालकांनी, कंपनीच्या मत्ताचे सुरक्षेसाठी तसेच लबाडी व अनियमिता शोधणे व त्याला आळा घालणे याची कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतुदीनुसार योग्य व पुरेशी काळजी घेऊन कंपनीच्या लेखाच्या अहवालाची देखभाल केली.

४. दि.३१ मार्च २०१२ रोजी संपलेल्या वर्षाच्या वार्षिक लेखा चाळीत संस्था पद्धतीने नमूद केले.

## ऊर्जा संबंधीत, तंत्रज्ञान वापर व परकीय चलनातील मिळकत व खर्च

कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २१७ (१)(इ), ज्याचे सहवाचन कंपनी (संचालक मंडळाच्या अहवालातील तपशीलाचे प्रकटन) नियम १९८८ सोबत केले जाते, यातील आवश्यकतेनुसार ऊर्जा संवर्धन, तंत्रज्ञान वापर व परकीय चलनात मिळकत व खर्च याची आवृती या अहवालाचा भाग असलेल्या जोडपत्र 'अ' मध्ये दिली आहे.

## सांविधिक लेखापरिक्षकांची निरिक्षणे / अभिप्राय यांना उत्तरे

सांविधिक लेखा परिक्षक यांनी त्यांच्या अहवालात नोंदलेला निरिक्षणे व अभिप्राय यावर कंपनीची उत्तरे जोडपत्र ब यात दिली आहेत.

## मुदतीच्या ठेवी

अहवाल वर्षात कंपनीने जनतेकडून कोणत्याही मुदतीच्या ठेवी भागविल्या / स्वीकारलेल्या नाहीत.

## खर्च लेखा परिक्षक

कंपनीने, कंपनी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांच्या मंजुरीच्या अधीन राहून मे.डी.व्ही.जोशी अँड कं. आणि मे.एस.आर. भार्गवे, अँड कंपनी, यांची संयुक्त खर्च लेखा परिक्षक म्हणून दि.३१/०३/२०१२ रोजी संपलेल्या वर्षापासून नियुक्ती केली आहे.

## लेखापरिक्षक

भारताचे लेखापाल व महालेखा परिक्षक यांनी कंपनीचे संयुक्त सांविधिक लेखा परिक्षक म्हणून मे. जी.एम. कापाडिया ॲण्ड कं., मुंबई, मे.सी.व्ही.के. ॲण्ड असोसिएट्स, मुंबई आणि मे.के.एस.अय्यर ॲण्ड कं. मुंबई वित्तीय वर्ष २०१२-१३ साठी नियुक्ती केली.

## ऋणनिर्देश

संचालक मंडळ, कंपनीच्या सहकार्य करणारी विविध शासकीय विभाग / संस्था, वित्तीस संस्था व बँका; सांविधिक लेखापरिक्षक, खर्च लेखा परिक्षक, सी. ॲण्ड ए.जी., नवी दिल्ली, ए.जी.(कमर्शियल) मुंबई, केंद्रिय व राज्य वीज नियामक प्राधिकारी अपील न्यायाधिकरणे व कंपनीचे भागधारक या सर्वांना केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेबद्दल कृतज्ञता व्यक्त करते. याशिवाय कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी तळमळीने गांभिर्यपूर्वक व ध्येयवादी वृत्तीने आपली कार्ये पार पाडली याबद्दल त्यांच्या कार्याची प्रशंसा करून ती या अहवालात नोंदवितो व त्यांना धन्यवाद देतो.

संचालक मंडळाच्या वतीने

(आशिष शर्मा)

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

दिनांक : ०९/०१/२०१३
स्थळ : मुंबई.

# संचालकच्या अहवालाचे पूरकपत्र अ

**कंपनी (संचालक मंडळाच्या अहवालात तपशीलाचे प्रकटन) नियमावली १९८८ नुसार आवश्यक तपशील**

## अ) ऊर्जा संवर्धन

वर्ष २०१०-११ मध्ये ऊर्जा बचतीसाठी खालील कार्ये करण्यात आली.

- कंपनी गृहअंतर्गत ऊर्जा वापर क्षेत्रे म्हणजे कॉम्प्रेस्ड एअर, फीड वॉटर, कुलींग वॉटर सिस्टीम, नुटर्स यांचे ऊर्जा अंकेक्षण / तपासणी केली.
- वीज केंद्रात कर्मचाऱ्यांची सतर्कता वाढावी कार्यक्रम/प्रशिक्षण घेण्यात आले.
- ऊर्जा संवंधनावर भिंती पत्रके / निबंध स्पर्धा इ. घेऊन जागरूकता निर्माण केली.
- सयंत्राच्या दैनंदीन कामकाजात त्यांच्या ज्ञानाचा उपयोग होणारे ऊर्जा अंकेक्षण / परिक्षण करण्यास पात्र असलेले अभियंता महानिर्मितीच्या ताफ्यात आहेत.

**विजेचा सहकार**

- विजेच्या सहवापराचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी ०.२ श्रेणीचे ऊर्जा मिटर्स वापरण्यात आले.
- दिवसा सूर्यप्रकाशाचा कमाल वापर केला.
- यंत्रे/साधने यांचा अयोग्य वापर टाळण्यात आला.
- कॉम्प्रेस्ड एअर, स्टीम फाईलींग, कुलींग वॉटर सिस्टिम व विज प्रणाली यातील गळती रोखण्यात आली.
- डी.एम. वॉटर फ्लो मिटर्सची स्थापना केली.
- जी.टी.युनीट, उरण येथे नैसर्गिक शितकरणाची व्यवस्था स्थितीवर लक्ष ठेवले.
- सहवापराच्या प्रतिबंधक देखभालीच्या वेळापत्रकांची वेळेवर अंमलबजावणी केली.

**प्रकाश योजना**

- एच.पी.एम.व्ही. दिव्यांऐवजी एच.पी.एस.व्ही. दिवे वापरण्यात आले.
- इलेक्ट्रॉनिक बलास्ट व सी.एफ.एल. प्रकाशयोजनेचा वापर.
- सेवेच्या इमारतीचे जिने व टर्बाइन बेसमेंट एरीआ येथे शक्य तेवढे व्यक्तिगत चालू / बंद होणारे प्रकाशाची बटणे (स्वीचेस) लावण्यात आली.

**उष्णाता ऊर्जा**

- ऑन लाईन कंडेसर ट्यूब क्लिनींग सिस्टीमवर योग्य लक्ष
- ऊष्णता रोधकांची वेळेवर तपासणी
- शक्य तेवढे एअर - प्री हीटर्स व भट्ट्या यांची स्वच्छता केली
- बॉयलरची जादा हवा पर्याप्त ठेवण्याकडे लक्ष दिले
- उष्णतेच्या दराची अ.अ./महाव्यवस्थापक/मुख्य अभियंता या स्तरावरून साप्ताहिक/पंधरवड्याला/महिन्याला नियमीत पहाणी.

**वंगण**

- सर्व वीज केंद्रात शून्य गळतीची संकल्पना सुरू केली
- गळतीतील इंधन तेल पून: मिळविण्यासाठी ऑईल स्कीमर्सची रचना विकसित केली.
- भुसावळ व नाशिक केंद्रात टर्बाईन आणि बी.एफ.आर. ऑईल केंद्रवर्ती पद्धतीने गाळून घेतले.

**डीएम वॉटर**

- डीएम वॉटर, फीड लाईन व स्टीम याची गळती रोखण्यास प्राधान्य दिले.
- खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात सोनिक बॉयलर ट्यूब डिटेक्शन सिस्टीम लावण्यात आली.

**संकीर्ण पाणी**

- कोराडी, नाशिक, खापरखेडा, चंद्रपूर केंद्रात राखेच्या पाण्याचा पूनर्वापराची यंत्रणा.
- आग प्रतिबंधक पाण्याचे नळ भूमिगत होते त्यांची गळती थांबविण्यासाठी ते जमिनीवर स्थापन करण्यात आले.

## ब) तंत्रज्ञानाचे समावेशन

अ) नमुना 'बी' नुसार, तंत्रज्ञानाचा समावेश करण्यासाठी प्रयत्न केले.

# नमुना ब

समावेशना संबधीच्या तपशीलाच्या प्रकरणाची माहिती

- अमोनिया इंजेक्शन फ्लू गॅस कंडीशनींग सिस्टीमची स्थापना
- परळी यूनीट ३ येथील कार्यपद्धतीचा दर्जा उंचावला.
- महानिर्मिती कं मुख्यालय व वीजनिर्मिती केंद्रे येथे 'इ' निविदा संकल्पना अंमलात आली.

## संशोधन व विकास

### १. कंपनीने संशोधन व विकासासाठी चालू केलेली निश्चित क्षेत्रे:

कुलींग वॉटरचे ओझनायझेशन, ए.एफ.जी.सी. सिस्टम, उरण येथे आयलँडीग व ब्लॅक स्टार्ट सुविधा, एअर टिटर्स येथे निरॉफॉन ॲकॉस्टिक क्लिनिंग सिस्टीम, ट्यूब लिकेज शोधाणारी प्रणाली, कोळसा गिरणीत एम.पी.एस.एम. सिस्टीमचा वापर, तेलाचा पूनः वापर करण्यासाठी तेल गाळणी व ऑईल स्किंपर्सचा यंत्राचा वापर आणि सांडलेले तेल पूनः मिळविण्याचे प्रयत्न.

### २. वरील संशोधन व विकासामुळे मिळविलेले लाभ

ओझोनायझेशन : पारंपारिक पद्धतीपेक्षा प्रवर्तनाचा खर्च कमी होतो. धातूंची झीज कमी होते, वापरण्यास सुरक्षित तसेच पाण्याच्या शीतकरणातील लिजीयनेला जंतूची पातळी नाहीसी होते.

ए.एफ.जी.सी.: प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणकानुसार औ.वि.केंद्रातील एस.पी.एम.ची पातळी १५० एम.जी. / एन.एम.३ यापेक्षा खाली ठेवली जाते.

आयलंड सिस्टीम (अलगीकरण पद्धत) : वीज जाळ्यात व्यत्यय/खंड झाल्यास अलग करण्याची योजना कार्यान्वित होते व जी.टी.पी.एस. स्थानिक व क्षेत्र वीज जाळ्यातून अलग होते.

ब्लॅक स्टार्ट फॅसिलीटी : जर वीज जाळ्याला धक्का बसला व त्यामुळे अलग करणारी यंत्रणाही अपयशी ठरली तर ब्लॅक स्टार्ट सुविधेमुळे युनीट्स पूनः पूर्वस्थितीत आणता येते व त्या क्षेत्रातील पूरवठा कमी वेळेत पूर्ववत करता येतो.

### ३. भविष्यातील कृती योजना

- आणखी काही औष्णिक विद्युत केंद्रात ए.एफ.जी.सी. यंत्रणा
- ऑनलाइन एनर्जी मॅनेजमेंट स्थापन करणार.

**४. संशोधन व विकासावर खर्च**

निरंक

## तंत्रज्ञान समावेशन, अंगीकार व नवीन संशोधन

१. तांत्रिक समावेशन, अंगीकार व नवीन संशोधन करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची संक्षिप्त माहिती.

२. वरील प्रयत्नांमुळे झालेले लाभ

कंपनीने कोणतेही आयात तंत्रज्ञान वापरलेले नाही.

## क) परकीय चलनातील मिळकत व खर्च

अ) निर्याती संबधी कार्य तसेच निर्यात वाढीसाठी नवे कार्य, उत्पादनात व सेवेस नवीन निर्यात बाजारपेठा विकसित करणे व निर्यात योजना.

ब) वापरलेले व मिळवलेले परकीय चलन

| वापरलेले / मिळविलेले एकूण परकीय चलन | | ₹ |
|---|---|---|
| १. | परकीय चलनातील खर्च<br>अ) सी.आय.एफ तत्त्वावर गणना केलेल्या भांडवली मालाचे मुल्य | निरंक |
| | मालाचे मुलघटक व सुटे भाग | ₹ ४,४११,८९७/- |
| | ब) खर्च | |
| | प्रवास खर्च | निरंक |
| २. | कमवलेले परकीय चलन | निरंक |

# पूरकपत्र ब १

# महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित लेखा परिक्षकांनी ०१.०४.२०११ ते ३१.०३. २०१२ या कालावधीसाठी च्या अहवालास कंपनीची उत्तरे

| अनु. | लेखापरिक्षकांचा परिछेद | महानिर्मिती कंपनीचा खुलासा |
|---|---|---|
| १) | आम्ही सोबत जोडलेली महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. ची दि.३१ मार्च २०१२ रोजी जसे होते तसे ताळेबंदाचे विवरण पत्र, सदर तारखेस संपलेल्या वर्षाचे नफा व तोटा पत्रक आणि या तारखेपर्यंत विस्तारीत असलेले रोकडता प्रवाह पत्रक, या कागदपत्राचे लेखापरिक्षण केलेले आहे. या वित्तीय विवरणपत्रांची जबाबदारी कंपनीच्या व्यवस्थापनाची असते. या वित्तीय विवरणपत्राच्या आमच्या लेखा परिक्षणानुसार त्यावर आधारीत अभिप्राय देणे ही आमची जबाबदारी आहे. | वस्तुस्थिती |
| २) | आम्ही आमचे लेखा परिक्षण, भारतात सामान्यपणे मान्य असलेल्या लेखा मानकांनुसार केलेले आहे. या लेखा मानकांच्या आवश्यकतेनुसार आम्ही लेखा परिक्षणाच्या कामाचे नियोजन करून ते पार पाडतो. त्यातुन आम्ही ही वित्तीय विवरणपत्रे कोणत्याही प्रत्यक्ष गैर विवरणापासून मुक्त आहेत किंवा कसे याबद्दल हमी मिळवितो. वित्तीय विवरणपत्रात दिलेल्या रकमा व प्रकटने यांना पुष्टी देणारे पुरावे शोधण्यासाठी प्रायोगिक तत्वावर त्याचे परिक्षण करणे याचा समावेश लेखा परिक्षणाच्या कामात असतो. तसेच लेखामध्ये वापरलेल्या लेखातत्वाचे आणि व्यवस्थापनाने केलेल्या महत्वाच्या अंदाजाचे मूल्यांकन करणे व सर्वकष वित्तीय सादरीकरणाचे मूल्यांकन करणे या कामाचा अंतर्भाव लेखापरिक्षणांत असतो. आमच्या अभिप्रायांना योग्य असा आधार आमच्या लेखा परिक्षणातून मिळतो असा आमचा विश्वास आहे. | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| ३) | भारताच्या केंद्र शासनाने, कंपनी अधिनियम १९५६ यातील कलम २२७ चे उपकलम (४ए) यातील शर्ती नुसार वितरीत केलेले कंपनीचे (लेखा परिक्षण) अहवाल आदेश २००३ (कंपनीचे लेखा परिक्षकांचे) अहवाल यानुसार (दुरूस्ती आदेश) २००४ यानुसार दुरूस्त केले.) यानुसार या आदेशाचे परिच्छेद ४ व ५ यात विनिर्देशित केलेल्या विषयासंबधी आम्ही जोडपत्रात एक पत्रक जोडले आहे. | वस्तुस्थिती |
| ४) | वरील जोडपत्रातील आमच्या अभिप्रायासह आम्ही अहवाल देतो की :<br><br>१. आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्दिष्टांसाठी आमचे सर्वोत्तम ज्ञान व विश्वास यानुसार आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्ही मिळविली आहेत. | वस्तुस्थिती |
| | २. आमच्या मते, या कंपनीने लेखासाठी कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली सर्व लेखा नोंद पुस्तके, योग्य प्रकारे तयार केली आहेत. आम्ही त्यांचे परिक्षण केले, त्यावरून ती योग्य प्रकारे ठेवल्याचे दिसून येते. | वस्तुस्थिती |
| | ३. या अहवालाशी संबंधित अशी ताळेबंद, नफा तोटा पत्रक व रोकडता प्रवाह पत्रक ही विवरण पत्रे या लेखा पुस्ताकांशी सहमती दाखवितात. | वस्तुस्थिती |
| | ४. अधिसूचना क्र.जी.एस.आर. ८२९ (इ) दि. २१/१०/२००३ यानुसार शासकीय कंपन्यांना कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २७४ (१) (जी) यातील तरतूदींना सूट दिली आहे. | वस्तुस्थिती |
| | ५. कंपनी (लेखामानके) नियम २००६ अंतर्गत दिलेल्या लेखा मानक - १९ यानुसार भाडेपट्टीची माहिती प्रकट न करणे यावरील टिपा क्र. ३८ (एक्स) (डी) टिपणीकडे लक्ष वेधण्यात येते. ह्यात विविध जलविद्युत निर्मिती प्रकल्पाच्या सुविधांबाबत भाडेपट्टीच्या कराराची महाराष्ट्र शासनासोबत करावयाची कार्यवाही प्रलंबित आहे. | महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या जलविद्युत निर्मिती केंद्रांचे भाडे बाबत महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार निश्चित केलेल्या भाडेपट्टी साठीचा लेखा महानिर्मिती कंपनीने केला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | ६. अंशदान भविष्य निर्वाह निधीच्या हंगामी लेखा आधारीत व्याजाच्या तूटीच्या लेखासंबंधी टिपणी क्र. ३८ (२) याकडे लक्ष वेधण्यात येते. यासंबंधी आवश्यक तपशील व माहिती उपलब्ध नाही. | सी.पी.एफ. गुंतवणूकीचे विमागणिती मूल्यांकन करण्यासाठी आवश्यक तपशील / माहिती सी.पी.एफ. च्या विश्वस्तांकडून मिळालेला नसल्याने असे विमागणिती मूल्यांकन करणे शक्य झाले नाही. |
| | ७. आमच्या मते या अहवालासंबंधीचे ताळेबंद, नफा व तोटा पत्रक व रोकडता प्रवाह विवरण पत्रे ही कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २११ यातील उपकलम (३ सी) यात दिलेल्या लेखा मानकांच्या गरजा पूर्ण करणारी आहेत. | वस्तुस्थिती |
| | ८. *कंपनीची दि.६ जून २००५ रोजीची कंपनीची मत्ता व दायित्वे यातील शिल्लक महाराष्ट्र विद्युत सुधारणा योजना २००५ अन्वये हस्तांतरीत केल्यानुसार आहेत. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार या शिलकी म.रा.वि.म. सूत्रधारी कंपनीने स्वीकारल्या आहेत. त्या अजून कंपनीकडे स्वीकारावयाच्या आहेत. तसेच आम्हाला आणखी माहिती देण्यात आली की, अंतिम हस्तांतरण योजना, महाराष्ट्र शासनाकडून अधिसूचित करावयाची आहे. जर या आरंभीच्या शिलकीमधे काही फरक झाला तर त्याचा प्रभाव कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रांवर पडू शकेल. याशिवाय आम्ही टिपा क्र.२ याचा संदर्भ देतो महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. याकडून यापूर्वीच्या वर्षात म.रा.वि.म. सूत्रधारी कंपनीने मान्यता दिलेल्या योजनेच्या अंशतः सुधारणानुसार स्थलांतरीत केलेले कर्ज व त्यावरील व्याज यांचे दायित्त्व यासंबंधी ही टिपा आहे.* | अंतीम हस्तांतरण योजना अंतिमीकरणासाठी महाराष्ट्र शासनाचे विशेष लक्षपूर्वक विचार चालू आहे. तीचे वित्तीय वर्ष २०१२-१३ मध्ये अंतिमीकरण होईल अशी अपेक्षा आहे. आरंभीच्या शिलकीवर होणाऱ्या प्रभावाच्याबाबत, महाराष्ट्र शासनाकडून अंतिम अधिसूचना मिळाल्यावर आवश्यक त्या नोंदी लेखा पुस्तकात मंजुरी घेऊन करण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | ९. *टिपा क्र.३१ यात नमूद केल्याप्रमाणे किरकोळ ऋणको यांच्याकडील शिल्लक कर्जे व अग्रीमे, अनामती, उपकंत्राटदारांकडील साहित्य, ठेवलेला पैसा, समाविष्ट केलेले किरकोळ धनको, पुरवठा केलेल्या साहित्याचे दायित्त्व, कोळसा कंपन्यांना दिलेली अग्रीमे, व त्यासाठीच्या तरतूदी या सर्व बाबी संबधितांनी कायम करावयाच्या आणि / किंवा उपकंपन्यांच्या अभिलेखांसोबत मेळ घालणे याच्या अधीन आहेत. त्या कायम होणे व मेळ घालण्याचे काम पूर्ण होणे प्रलंबित असल्याने, त्याचे परिणाम स्वरूप समायोजन करता येणे शक्य नव्हते. यामुळे, जर काही या परिणामाचा प्रभाव या शिलकीवर व कंपनीच्या नफ्यावर झाल तर त्यासंबंधी अभिप्राय देणे आम्हास शक्य नाही.* | पुढील बाबींसंबंधी उप नोंदवह्या (सबसिडीयरी लेजर्स तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. याबाबी अश्या किरकोळ ऋणको, कर्जे व अग्रीमे, जमा रकमा, उप कंत्राट दारांकडील सामान, शिल्लक रकमेसह किरकोळ धनको सामान पुरविण्याची दायित्त्वे, ग्राहकांकडील अग्रीमे कोळसा कंपन्यांना दिलेली अग्रीमे. काही लेखाच्या युनीट्स येथे संबंधित संस्थांकडे असलेली शिल्लक कायम करण्यासाठी त्यांच्या नावे पत्रेही दिली आहेत. जेथे खूप जुनी शिल्लक असल्यामुळे व सर्तोतपरी बारकाईने प्रयत्न करूनही त्यांची सांगड घालता येत नसेल तेथे निर्लेखित करणे / पूनर्लेखन करणे यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल म्हणजे त्याबाबत स्पष्ट शिल्लक मांडता येईल.) |
| | १०. *टिपा क्र.३२ यात नमूद केल्याप्रमाणे कर्जे व अग्रीमे यात कोळसा पुरवठादारांना दिलेले अग्रीम ₹२४,५९०,७६२,९६९/- समाविष्ट आहे. सदर अग्रीमामुळे कंपनीने कोळसा पुरवठ्यासाठी ₹२५,४०६,४०७,०१७/- या रकमेच्या दायित्त्वाची तरतूद केली आहे. देयकांची अंतीम मंजूरी प्रलंबित असल्याने कंपनीने या दायित्त्वाची वजावट केली नाही. यामुळे कंपनीच्या संबंधित मत्ता व दायित्त्वे यांचे अतिरिक्त विवरण झाले आहे. या अतिरिक्त विवरणाचा प्रभाव व कंपनीच्या नफ्यावरील परिणाम निश्चित करता आलेला नाही.* | कोळसा कंपन्यांना अग्रीमे देणे व त्याचा निपटारा करणे ही नियमित कृती आहे. वि.वर्ष २०११-१२ कोळसा साठ्याच्या प्राप्तींच्या नोंदीच्या पावत्यांचा निपटारा करण्याचे काम पूढेही तसे चालू ठेवले. आणि त्यामुळे कोळसा अग्रीमे व कोळसा दायित्त्वे या आणखी हिशेब करता आला. त्यामुळे सदर अग्रीमे व दायित्त्वे रु.२,७००/- कोटीवरून २४५० कोटी इतक्या कमी पातळीवर आणले. |
| | ११. *ही कंपनी सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योजक विकास अधिनियम २००६ यातील तरतुदीनुसार पुरवठादारांचा शोध करून घेण्याच्या प्रक्रियेमध्ये आहे. त्यामुळे त्यासंबंधीची प्रकटने करण्याची आवश्यकता नाही.* | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| | *१२. टिपा क्र.३५ (२) यात म्हटल्याप्रमाणे कोळसा धुण्याचे काम करणाऱ्यांकडून करावयाच्या विविध वसुलीचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे त्यांच्या '१,१३६,३१७,४०७/- (निव्वळ) या वसूलीच्या रकमेबाबत तरतूद केलेली नाही. या वित्तीय विवरणपत्रांचा प्रभाव निश्चित केलेला नाही.* | बँक गॅरंटीचे रोखी करण्याबाबत कोळसा धुलाई केंद्राने स्थगितीचा आदेश मिळविला. या प्रकरणी समझोता झाल्यावर त्याचा परिणाम लेखा पुस्तकात दिला जाईल. |
| | *१३. टिपा क्र.३६ यात म्हटल्याप्रमाणे, कंपनीने कामाच्या जागी साहित्याचा लेखा करणे (मासा) ही पद्धती पूनर्स्थापित केली आहे. प्रत्यक्ष पडताळणी व विविध घटक कार्यालयाकडून मिळालेली माहिती याआधारे पूनर्स्थापना करण्यात आली. त्याचे समायोजन वर्षाच्या साहित्याच्या वापरात केले आहे. कंपनीने या पूनर्स्थापनेचा परिणाम निश्चित केलेला नाही.* | कंपनीने विभागाच्या भांडारात प्रत्येक वस्तू निहाय तपशीलवार पडताळणी केली व भांडारातील वस्तू माल साठ्यात समाविष्ट केला. विविध ठिकाणाच्या साठ्याचे मूल्यांकन तेथील माहितीच्या आधारे करण्यात आले. |
| | *१४. वरील परिच्छेद क्र. ४(८) ते (१३) यातील आमच्या अभिप्रायाच्या अधीन राहून आम्ही मत देतो की, आमची सर्वोत्तम माहिती व आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यावरून हे सदर लेखा व त्यावर दिलेल्या टिपांचे सहवाचन हे कंपनी अधिनियम १९५६ यात दिलेल्या पद्धतीच्या आवश्यकतेनुसार आहे आणि भारतातील सर्वमान्य लेखातत्त्वे यांना अनुसरून सत्य व योग्य दर्शन सादर करतात.* | वस्तुस्थिती |
| | अ. **ताळेबंदासंबंधी** - कंपनीच्या व्यवहाराच्या दि. ३१ मार्च २०१२ रोजी असणाऱ्या स्थितीनुसार आहे. | |
| | ब. **नफा व तोटा यांच्या लेखासंबंधी** - सदर दिनांकास संपलेल्या दिवशी असणारा नफा दर्शवितात. | |
| | क. **रोकडता प्रवाह विवरण पत्रा संबंधी** - सदर दिनांकास संपलेल्या वर्षासाठीचे रोकडता प्रवाह दर्शवितात. | |

# पूरकपत्र ब २

# महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित लेखा परिक्षकांनी ०१.०४.२०११ ते ३१.०३. २०१२ या कालावधीसाठी च्या अहवालातील जोडपत्रास कंपनीची उत्तरे

| अ.क्र. | लेखा परिक्षकांचा अहवाल | महानिर्मिती कंपनीचे उत्तर |
|---|---|---|
| | लेखा परिक्षकांच्या अहवालास जोडपत्र | |
| १) | अ) *या कंपनीने पूर्ण तपशील दर्शविणारी योग्य अभिलेखांचे व्यवस्थितपणे जतन केले आहे. ज्या जागांवरील काही थोड्या मत्तांचे बाब निहाय तपशील घेणे व स्थीर मत्तांचे संहिता करण करणे यांचा अपवाद काढता स्थीर मत्तांची संख्यात्मक माहिती व जागा यांचा समावेश अभिलेखांमध्ये केलेला आहे.* | याबाबतचा लेखा परिणाम यापूर्वीचा पूर्ण करण्यात आला. संबंधित जागेवरील लेखा नोंदींच्या आधारे स्थीर मत्तांची नोंदवही अद्यावत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे हे काम वि.वर्ष २०१२-१३ मध्ये पूर्ण होईल. |
| | ब) आम्हास दिलेल्या माहितीनुसार स्थीर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी तीन वर्षात एकदा करण्याचे कंपनीचे धोरण आहे. आमच्या मते हे धोरण कंपनीचा आकार व व्यवहाराचे स्वरुप यानुसार योग्य व व्यवहार्य आहे. यानुसार कंपनीच्या स्थीर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी यावर्षी व्यवस्थापनाने केलेली नाही. | वस्तुस्थिती |
| | क) लेखा परिक्षणाच्या वर्षात कंपनीने स्थीर मत्तेची मोठ्या प्रमाणात विल्हेवाट लावली नाही. | वस्तुस्थिती |
| २) | अ) वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापनाने योग्य अशा ठराविक अंतराने केली आहे. *मात्र कोळसा धुलाई करणाऱ्या चालकांकडील वस्तूसुचींची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. अशा वस्तूसुचीची निश्चिती तिसऱ्या पक्षांकडून झालेली नाही.* | कोळसा धुलाई केंद्राच्या चालकांनी त्यांच्याकडील साठ्याची मता दिली नाही; कारण कंपनी व धुलाई केंद्र चालक यांच्यात काही समस्यांचे निराकरण अद्याप व्हायचे आहे. |

| | | |
|---|---|---|
| | ब) आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती यानुसार व्यवस्थापनाने अनुसरलेली वस्तूसूचीच्या प्रत्यक्ष पडताळणीची कार्यपद्धती कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरूप लक्षात घेता योग्य व पुरेशी आहे. मात्र तिसऱ्या पक्षांकडील असलेल्या वस्तूसूचींचा त्याला अपवाद आहे. | वस्तुस्थिती |
| | क) वस्तुसूचीच्याअभिलेखांचे आम्ही केलेले परिक्षण व प्रत्यक्ष पडताळणीचे अहवाल या आधारे आमचे मत आहे की, कंपनी वस्तूसूचीच्या अभिलेखांचे योग्य प्रकारे जतन करीत आहे. कोळश्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही सामग्रीत विसंगत नाही. कोळशातील विसंगतीचे लेखात योग्य समायोजन केले. *फक्त कोळसा धुलाई करणाऱ्यांकडील वस्तुसूचीचा याला अपवाद आहे.* | वस्तुस्थिती |
| ३) | अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या (महानिर्मिती) कंपनीने या वर्षात कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत समावेश केलेल्या अन्य कंपन्या, फर्म्स किंवा इतर संस्था यांना कोणतीही कर्जे मंजूर केलेली नाहीत म्हणून वरील आदेशाच्या परिच्छेद ४ यातील कलम (३) इलेक्ट्रीक च्या उपकलम 'ए' ते 'डी' नुसार अहवाल देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. | वस्तुस्थिती |
| | ब) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून दिसून येते की, सदर वर्षात कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत समावेश केलेल्या अन्य कंपन्या, फर्म्स किंवा इतर संस्था यांच्याकडून कोणतीही कर्जे घेतली नाहीत म्हणून वरील आदेशाच्या परिच्छेद ४ यातील कलम (३) च्या उपकलम 'इ' ते 'जी' नुसार कोणताही अहवाल देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. | वस्तुस्थिती |
| ४) | आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीचे आकारमान व तिच्या व्यवसायाचे स्वरूप याला सुसंगत अशी पुरेशी अंतर्गत नियंत्रण प्रणाली कार्यरत आहे व तिचा उपयोग वस्तु सूचींची व स्थीर मत्तांची खरेदी, तसेच माल व सेवा यांची विक्री यासाठी केला जातो. | वस्तुस्थिती |
| ५) | लेखा पुस्तकांचे आम्ही केलेले परिक्षण व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे याच्या आधारे, कंपनीने कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत नोंद करण्याजोगा एकही व्यवहार केलेला नाही. | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| ६) | आमच्या मते व आम्हांस दिलेला स्पष्टीकरणे यानुसार कंपनी अधिनियम १९५६ चे कलम ५८ए आणि ५८एए तसेच कंपनी (ठेवी स्वीकारणे) नियम १९७५, यातील अर्थनुसार कंपनीने जनतेकडून ठेवी स्वीकारलेल्या नाहीत. आम्हास दिलेल्या माहितीनुसार कंपनी लॉ बोर्ड, नॅशनल कंपनी लॉ ट्रायब्युनल, आर.बी.आय्. आणि अन्य कोणतेही न्यायाधिकरण किंवा न्यायालय यांनी कंपनीच्या विरोधात कोणताही आदेश काढलेला नाही. | वस्तुस्थिती |
| ७) | कंपनीने आपले मुख्यालय आणि अन्य जागी अंतर्गत लेखा परिक्षण करण्यासाठी बाह्य सनदी लेखापालांच्या संस्थांची नियुक्ती केली आहे. *मात्र त्यांचे अहवाल वेळेवर मिळालेले नाहीत.* याच्या अधीन राहून आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून कंपनीमधील सध्याची अंतर्गत लेखापरिक्षण प्रणाली ही कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरूप याच्याशी सुसंगत व पुरेशी आहे. | अंतर्गत लेखा परिक्षण मासिक तत्त्वावर करण्यात येत आहे आणि हे अहवाल वेळेवर सादर केले जाण्याची खात्री केली जाईल. |
| ८) | केंद्र शासनाने कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २०९ (१) (डी) यानुसार खर्चाच्या नोंदी ठेवण्यासाठी विहीत केलेल्या नियमानुसार, कंपनीने जतन केलेल्या लेखा पुस्तकांचा आम्ही स्थूलपणे आढावा घेतला. मात्र अभिलेख योग्यपणे आहेत असे आमचे प्रथमदर्शनी मत आहे. मात्र या अभिलंखांची अचूकता व परिपूर्णता निश्चित करण्यासाठी आम्ही त्याचे तपशीलवार परिक्षण केलेले नाही. | वस्तुस्थिती |
| ९) | अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून कंपनी सामान्यपणे, निर्विवाद अशी सांविधिक देणी योग्य प्राधिकाऱ्यांकडे नियमीतपणे भरत आहे. यामधे भविष्यनिर्वाह निधी, गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी, कर्मचाऱ्यांचा राज्य विमा, आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, उपकर आणि लागू असणारी अन्ये सांविधिक देणी यांचा समावेश होतो.<br><br>आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार निर्विवाद असलेल्या सांविधिक देणी म्हणजे आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क याची थकबाकी ती देय असल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या कालावधीत, ताळेबंदाच्या तारखेस नव्हती. | वस्तुस्थिती |

<table>
<tr>
<td></td>
<td>ब) कंपनीच्या अभिलेखानुसार, खाली दिलेल्या बाबी व्यतिरिक्त आयकर / विक्रीकर / सेवाकर / सीमा शुल्क / संपत्ती कर / उत्पादन शुल्क / उपकर याचा भरणा करण्यात आला आहे. खालील प्रकरणी वाद आहेत ते असे
<table>
<tr><th>थकित रकमेचे स्वरुप</th><th>भरणा न केलेली रक्कम</th><th>जेथे वाद प्रलंबित आहे तो मंच</th></tr>
<tr><td>उत्पादन शूल्क</td><td>₹२,६७०,३७५/-</td><td>आयुक्त केंद्रीय उत्पादन शूल्क</td></tr>
<tr><td>वर्षे २००६-०७ साठी आयकर कायदा १९६१ च्या कलम २७१ (सी) अनुसार दंड</td><td>₹१,०७३,२१५,४४०/-</td><td>आयुक्त (अपील) मुंबई</td></tr>
<tr><td>सेवाकरापोटी कलम १९४ सी अंतर्गत स्त्रोतापाशी कापलेला आयकर</td><td>₹८९५,०००/-</td><td>आय.टी.ए.टी. पुणे शाखा</td></tr>
</table>
</td>
<td>वस्तुस्थिती</td>
</tr>
<tr>
<td>१०)</td>
<td>या वित्तीय वर्षाच्या अखेरीस कंपनीकडे कोणतेही संचित तोटे नाहीत. कंपनीच्या लेखा वह्यांनुसार वित्तीय वर्षात आणि नजीकच्या मागील वर्षात कंपनीला कोणताही रोख रकमेचा तोटा झालेला नाही.</td>
<td>वस्तुस्थिती</td>
</tr>
<tr>
<td>११.</td>
<td>आमची लेखा परिक्षणाची कार्यपद्धती आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणत्याही वित्तीय संस्थेची किंवा बँक व ऋणपत्रधारक यांच्या थकबाकीची परतफेड थांबविलेली नाही.</td>
<td>वस्तुस्थिती</td>
</tr>
<tr>
<td>१२.</td>
<td>आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणासही भाग (शेअर्स) ऋणपत्रे किंवा अन्य प्रतिभूती गहाण ठेवून त्याच्या हमीच्या आधारे कोणतेही कर्ज आणि अग्रीम रकमा दिल्या नाहीत.</td>
<td>वस्तुस्थिती</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| १३. | आमच्या मते आणि आमच्या सर्वोत्कृष्ट माहिती व आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे यानुसार आम्ही नमुद करतो की सदर कंपनी ही एक चीट फंड किंवा निधी / म्यूच्यूअल बेनेफिट फंड / सोसायटी नाही. म्हणून आमच्यामते वरील आदेशाच्या परिच्छेद क्र.४ च्या कलम (१३) यातील तरतुदी सदर कंपनीला लागू होत नाही. | वस्तुस्थिती |
| १४) | कंपनीचे अभिलेख व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार सदर कंपनी शेअर्स, सिक्युरीटीज, डिबेंचर्स किंवा अन्य गुंतवणूकी यातील व्यवहार करीत नाही म्हणून वरील आदेशाच्या परिच्छेद क्र.४ यातील तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत. | वस्तुस्थिती |
| १५) | कंपनीचे अभिलेख व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने इतरांनी बँका आणि / किंवा वित्तसंख्या यांच्याकडून घेतलेल्या कोणत्याही कर्जास हमी दिलेली नाही. | वस्तुस्थिती |
| १६) | आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती यानुसार, एकंदरीतपणे कंपनीने यावर्षात मुदत कर्जे ज्या हेतुसाठी मिळविली त्याचसाठी वापरली आहेत. | वस्तुस्थिती |
| १७) | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आणि आम्ही केलेल्या ताळेबंद व रोकडता प्रवाह विवरणपत्र यांच्या सर्वप्रकारे परिक्षणाप्रमाणे आम्ही नमुद करतो की, अल्प मुदतीच्या निधीतील ₹४९,३९८,३७४,३३२/- (मागील वर्ष ₹२०,१७२,९६३,२६८/-) दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीसाठी वापरण्यात आले. व्यवस्थापनाच्या मते विविध चालू व अन्य (चालू स्वरुपाच्या नसलेल्या) मत्ता व दायित्वे आणि नव्या प्रकल्पांसाठी मुदतीच्या कर्जाच्या रकमेची प्राप्ती प्रलंबित असल्यामुळे घ्याव्या लागलेल्या बँक कर्जे या सर्वांचे पूनवर्गीकरण सुधारीत अनुसूची सहा यांच्या अंमलबजावणीमुळे असे करावे लागले. | वस्तुस्थिती |
| १८) | या वित्तीय वर्षात अधिनियमाच्या कलम ३०१ अंतर्गत जतन करण्यात येणाऱ्या नोंदणीवहीत समावेश केलेल्या व्यक्ती / संस्था आणि कंपन्या यांना महानिर्मिती कंपनीने कोणत्याही शेअर्सचे विशेष पसंतीने वाटप केलेले नाही. | वस्तुस्थिती |
| १९) | कंपनीने कोणतीही ऋणपत्रे दिलेली नाहीत; म्हणून हे कलम लागू नाही. | वस्तुस्थिती |
| २०) | कंपनीने या लेखा परिक्षणाच्या कालावधीत जनतेकडून कोणताही सार्वजनिक निधी घेतलेला नाही. त्यानुसार वरील आदेशातील परिच्छेद ४ च्या कलम (२०) यातील तरतूदी लागू नाहीत. | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| २१) | सर्वमान्य लेखापरिक्षणाच्या पद्धतीनुसार लेखा पुस्तकांचे परिक्षण करताना आम्हास कंपनीबाबत किंवा तिच्यातर्फे कोणतेही लबाडीचे कृत्य दिसलेले नाही. यामध्ये कंपनीच्या दक्षता कक्षाकडील प्रकरणे भारताचे महानियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी वित्तीय वर्षातील चौकश्या यांचाही समावेश आहे. | वस्तुस्थिती |

# महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य

**भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा, कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९ (४) यानुसार महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. मुंबई यांच्या दि. ३१ मार्च २०१२ रोजी संपलेल्या वर्षातील लेखांवर अभिप्रायः**

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,** मुंबई या कंपनीचे दि. ३१ मार्च २०१२ रोजी संपलेल्या वर्षाची वित्तीय विवरण पत्रे कंपनी अधिनियम १९५६ च्या अंतर्गत वित्तीय अहवालच्या विहीत आकृतीबंधाप्रमाणे तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९(२) नुसार सांविधिक लेखापरिक्षकाची नियुक्ती केलेली आहे. या वित्तिय विविरण पत्रांवर कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २२७ नुसार सदर लेखापरिक्षकांनी, त्यांची व्यावसायिक संस्था दि. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटट्स ऑफ इंडिया यांनी विहित केलेल्या लेखापरिक्षणाच्या व आश्वासक मानकांशी सुसंगत अशा रितीने विवरणपत्राचे स्वतंत्र लेखापरिक्षण करून त्यावर अभिप्राय देणे ही त्यांची जबाबदारी आहे. त्यांनी ती पार पाडल्याचे त्यांच्या लेखा परिक्षण अहवालात दि. २१ सप्टेंबर २०१२ नमूद केलले आहे.

मी, भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्यावतीने, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित मुंबई, या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०१२ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तिय विवरणपत्राचे, कंपनी अधिनियम १९५६ याच्या कलम ६१९(३) (बी) अनुसार पूरक लेखा परिक्षण केले. हे पूरक लेखा परिक्षण स्वतंत्रपणे व सांविधिक लेखापाल यांच्याकडील कामाची कागदपत्रे प्राप्त न करता करण्यात आले असून ते प्रामुख्याने सांविधिक लेखापरिक्षक व कंपनीचे कर्मचारी यांच्याकडे विचारणा करणे आणि काही निवडक लेखा दस्त ऐवजाचे परिक्षण करणे या मर्यादेत करण्यात आलेले आहे.

या माझ्या लेखापरिक्षणाच्या आधारे माझ्या लक्षात आलेल्या व कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९(४) अंतर्गत सांविधिक लेखा परिक्षणावर अभिप्राय देण्याजोगत कोणतीही अर्थपूर्ण बाब नाही.

**भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक**
**यांचेसाठी व त्यांच्यावतीने**

**महालेखापाल**
**(लेखापरिक्षण - III)**

**स्थळः** मुंबई
**दिनांकः** २०.१२.२०१२

# लेखा परिक्षकांचा अहवाल

प्रती,

मा. सदस्य

महाराष्ट्र राज्य वीज निर्मित कंपनी लिमिटेड.

१. आम्ही सोबत जोडलेली महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. ची दि.३१ मार्च २०१२ रोजी जसे होते तसे ताळेबंदाचे विवरण पत्र, सदर तारखेस संपलेल्या वर्षाचे नफा व तोटा पत्रक आणि या तारखेपर्यंत विस्तारीत असलेले रोकडता प्रवाह पत्रक, या कागदपत्राचे लेखापरिक्षण केलेले आहे. या वित्तीय विवरणपत्रांची जबाबदारी कंपनीच्या व्यवस्थापनाची असते. या वित्तीय विवरणपत्राच्या आमच्या लेखा परिक्षणानुसार त्यावर आधारीत अभिप्राय देणे ही आमची जबाबदारी आहे.

२. आम्ही आमचे लेखा परिक्षण, भारतात सामान्यपणे मान्य असलेल्या लेखा मानकांनुसार केलेले आहे. या लेखा मानकांच्या आवश्यकतेनुसार आम्ही लेखा परिक्षणाच्या कामाचे नियोजन करून ते पार पाडतो. त्यातुन आम्ही ही वित्तीय विवरणपत्रे कोणत्याही प्रत्यक्ष गैर विवरणापासून मुक्त आहेत किंवा कसे याबद्दल हमी मिळवितो. वित्तीय विवरणपत्रात दिलेल्या रकमा व प्रकटने यांना पुष्टी देणारे पुरावे शोधण्यासाठी प्रायोगिक तत्वावर त्याचे परिक्षण करणे याचा समावेश लेखा परिक्षणाच्या कामात असतो. तसेच लेखामध्ये वापरलेल्या लेखातत्वाचे आणि व्यवस्थापनाने केलेल्या महत्वाच्या अंदाजाचे मूल्यांकन करणे व सर्वकष वित्तीय सादरीकरणाचे मूल्यांकन करणे या कामाचा अंतर्भाव लेखापरिक्षणांत असतो. आमच्या अभिप्रायांना योग्य असा आधार आमच्या लेखा परिक्षणातून मिळतो असा आमचा विश्वास आहे.

३. भारताच्या केंद्र शासनाने, कंपनी अधिनियम १९५६ यातील कलम २२७ चे उपकलम (४ए) यातील शर्ती नुसार वितरीत केलेले कंपनीचे (लेखा परिक्षण) अहवाल आदेश २००३ (कंपनीचे लेखा परिक्षकांचे) अहवाल यानुसार (दुरूस्ती आदेश) २००४ यानुसार दुरूस्त केले.) यानुसार या आदेशाचे परिच्छेद ४ व ५ यात विनिर्देशित केलेल्या विषयासंबधी आम्ही जोडपत्रात एक पत्रक जोडले आहे.

४. वर संदर्भ दिलेल्या जोडपत्रातील आमच्या अभिप्रायाला अनुसरून आम्ही पुढील अहवाल देतो की,

  १. आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्दिष्टांसाठी आमचे सर्वोत्तम ज्ञान व विश्वास यानुसार आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्ही मिळविली आहेत.

  २. आमच्या मते, या कंपनीने लेखासाठी कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली सर्व लेखा नोंद पुस्तके, योग्य प्रकारे तयार केली आहेत. आम्ही त्यांचे परिक्षण केले, त्यावरून ती योग्य प्रकारे ठेवल्याचे दिसून येते.

  ३. या अहवालाशी संबंधित अशी ताळेबंद, नफा तोटा पत्रक व रोकडता प्रवाह पत्रक ही विवरण पत्रे या लेखा पुस्ताकांशी सहमती दाखवितात.

  ४. अधिसूचना क्र.जी.एस.आर. ८२९ (इ) दि. २१/१०/२००३ यानुसार शासकीय कंपन्यांना कंपनी अधिनियम

१९५६ च्या कलम २७४ (१) (जी) यातील तरतूदींना सूट दिली आहे.

५. कंपनी (लेखामानके) नियम २००६ अंतर्गत दिलेल्या लेखा मानक - १९ यानुसार भाडेपट्टीची माहिती प्रकट न करणे यावरील टिपा क्र. ३८ (एक्स) (डी) टिपणीकडे लक्ष वेधण्यात येते. ह्यात विविध जलविद्युत निर्मिती प्रकल्पाच्या सुविधांबाबत भाडेपट्टीच्या कराराची महाराष्ट्र शासनासोबत करावयाची कार्यवाही प्रलंबित आहे.

६. अंशदान भविष्य निर्वाह निधीच्या हंगामी लेखा आधारीत व्याजाच्या तूटीच्या लेखासंबंधी टिपणी क्र. ३८ (२) याकडे लक्ष वेधण्यात येते. यासंबंधी आवश्यक तपशील व माहिती उपलब्ध नाही.

७. आमच्या मते या अहवालासंबंधीचे ताळेबंद, नफा व तोटा पत्रक व रोकडता प्रवाह विवरण पत्रे ही कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २११ यातील उपकलम (३ सी) यात दिलेल्या लेखा मानकांच्या गरजा पूर्ण करणारी आहेत.

*८. कंपनीची दि.६ जून २००५ रोजीची कंपनीची मत्ता व दायित्त्वे यातील शिल्लक महाराष्ट्र विद्युत सुधारणा योजना २००५ अन्वये हस्तांतरीत केल्यानुसार आहेत. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार या शिलकी म.रा.वि.म. सूत्रधारी कंपनीने स्वीकारल्या आहेत. त्या अजून कंपनीकडे स्वीकारावयाच्या आहेत. तसेच आम्हाला आणखी माहिती देण्यात आली की, अंतिम हस्तांतरण योजना, महाराष्ट्र शासनाकडून अधिसूचित करावयाची आहे. जर या आरंभीच्या शिलकीमधे काही फरक झाला तर त्याचा प्रभाव कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रांवर पडू शकेल. याशिवाय आम्ही टिपा क्र.२ याचा संदर्भ देतो महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. याकडून यापूर्वीच्या वर्षात म.रा.वि.म. सूत्रधारी कंपनीने मान्यता दिलेल्या योजनेच्या अंशतः सुधारणानुसार स्थलांतरीत केलेले कर्ज व त्यावरील व्याज यांचे दायित्त्व यासंबंधी ही टिपा आहे.*

*९. टिपा क्र.३१ यात नमूद केल्याप्रमाणे किरकोळ ऋणको यांच्याकडील शिल्लक कर्जे व अग्रीमे, अनामती, उपकंत्राटदारांकडील साहित्य, ठेवलेला पैसा, समाविष्ट केलेले किरकोळ धनको, पुरवठा केलेल्या साहित्याचे दायित्त्व, कोळसा कंपन्यांना दिलेली अग्रीमे, व त्यासाठीच्या तरतूदी या सर्व बाबी संबधितांनी कायम करावयाच्या आणि / किंवा उपकंपन्यांच्या अभिलेखांसोबत मेळ घालणे याच्या अधीन आहेत. त्या कायम होणे व मेळ घालण्याचे काम पूर्ण होणे प्रलंबित असल्याने, त्याचे परिणाम स्वरूप समायोजन करता येणे शक्य नव्हते. यामुळे, जर काही या परिणामाचा प्रभाव या शिलकीवर व कंपनीच्या नफ्यावर झाल तर त्यासंबंधी अभिप्राय देणे आम्हास शक्य नाही.*

*१०. टिपा क्र.३२ यात नमूद केल्याप्रमाणे कर्जे व अग्रीमे यात कोळसा पुरवठादारांना दिलेले अग्रीम ₹२४,५९०,७६२,९६९/- समाविष्ट आहे. सदर अग्रीमामुळे कंपनीने कोळसा पुरवठ्यासाठी ₹२५,४०६,४०७,०१७/- या रकमेच्या दायित्त्वाची तरतूद केली आहे. देयकांची अंतीम मंजूरी प्रलंबित असल्याने कंपनीने या दायित्त्वाची वजावट केली नाही. यामुळे कंपनीच्या संबंधित मत्ता व दायित्त्वे यांचे अतिरिक्त विवरण झाले आहे. या अतिरिक्त विवरणाचा प्रभाव व कंपनीच्या नफ्यावरील परिणाम निश्चित करता आलेला नाही.*

*११. ही कंपनी सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योजक विकास अधिनियम २००६ यातील तरतुदीनुसार पुरवठादारांचा शोध करून घेण्याच्या प्रक्रियेमध्ये आहे. त्यामुळे त्यासंबंधीची प्रकटने करण्याची आवश्यकता नाही.*

*१२. टिपा क्र.३५ (२) यात म्हटल्याप्रमाणे कोळसा धुण्याचे काम करणाऱ्यांकडून करावयाच्या विविध वसुलीचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे त्यांच्या ₹ १,१३६,३१७,४०७/- (निव्वळ) या वसूलीच्या रकमेबाबत तरतूद केलेली नाही. या वित्तीय विवरणपत्रांचा प्रभाव निश्चित केलेला नाही.*

*१३. टिपा क्र.३६ यात म्हटल्याप्रमाणे, कंपनीने कामाच्या जागी साहित्याचा लेखा करणे (मासा) ही पद्धती पूनर्स्थापित केली आहे. प्रत्यक्ष पडताळणी व विविध घटक कार्यालयाकडून मिळालेली माहिती याआधारे पूनर्स्थापना करण्यात आली. त्याचे समायोजन वर्षाच्या साहित्याच्या वापरात केले आहे. कंपनीने या पूनर्स्थापनेचा परिणाम निश्चित केलेला नाही.*

*१४. वरील परिच्छेद क्र. ४(८) ते (१३) यातील आमच्या अभिप्रायाच्या अधीन राहून आम्ही मत देतो की, आमची सर्वोत्तम माहिती व आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यावरून हे सदर लेखा व त्यावर दिलेल्या टिपांचे सहवाचन हे कंपनी अधिनियम १९५६ यात दिलेल्या पद्धतीच्या आवश्यकतेनुसार आहे आणि भारतातील सर्वमान्य लेखातत्त्वे यांना अनुसरून सत्य व योग्य दर्शन सादर करतात.*

**अ) ताळेबंदासंबंधी -** कंपनीचा व्यवहार दि.३१ मार्च २०१२ रोजीच्या स्थितीनुसार आहे.

**ब) नफा व तोटा याचे लेखासंबंधी -** सदर तारखेला संपलेल्या दिवशीचा नफा दर्शवितात.

**क) रोकडता प्रवाह विवरण पत्रासंबंधी -** सदर तारखेला संपलेल्या दिवशीचा रोकडता प्रवाह दर्शवितात.

**सी.व्ही.के. अँड असोशिएटस्**
सनदी लेखापाल
**एफआरएन: १०१७४५ डब्ल्यू**

**अशोक के. प्रधान**
भागीदार
एम.नं. ३२१५६

**के.एस.अय्यर अँड कंपनी**
सनदी लेखापाल
**एफआरएन: १००१८६ डब्ल्यू**

**राजेश एस. जोशी**
भागीदार
एम.नं. ३८५२६

**जी.एम.कापाडीया अँड कं.**
सनदी लेखापाल
**एफआरएन: १०४७६७ डब्ल्यू**

**राजन आर. अशर**
भागीदार
एम.नं. ४८२४३

स्थळ : मुंबई
दिनांक : २१ सप्टेंबर २०१२

## जोडपत्रः आमचा समान तारखेच्या अहवालाच्या परिच्छेद ३ यातील संदर्भानुसार

१. अ) *या कंपनीने पूर्ण तपशील दर्शविणारी योग्य अभिलेखांचे व्यवस्थितपणे जतन केले आहे. ज्या जागांवरील काही थोड्या मत्तांचे बाब निहाय तपशील घेणे व स्थीर मत्तांचे संहिता करण करणे यांचा अपवाद काढता स्थीर मत्तांची संख्यात्मक माहिती व जागा यांचा समावेश अभिलेखांमध्ये केलेला आहे.*

ब) आम्हास दिलेल्या माहितीनुसार स्थीर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी तीन वर्षात एकदा करण्याचे कंपनीचे धोरण आहे. आमच्या मते हे धोरण कंपनीचा आकार व व्यवहाराचे स्वरुप यानुसार योग्य व व्यवहार्य आहे. यानुसार कंपनीच्या स्थीर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी यावर्षी व्यवस्थापनाने केलेली नाही.

क) लेखा परिक्षणाच्या वर्षात कंपनीने स्थीर मत्तेची मोठ्या प्रमाणात विल्हेवाट लावली नाही.

२. अ) वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापनाने योग्य अशा ठराविक अंतराने केली आहे. *मात्र कोळसा धुलाई करणाऱ्या चालकांकडील वस्तूसुचींची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. अशा वस्तूसुचीची निश्चिती तिसऱ्या पक्षांकडून झालेली नाही.*

ब) आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती यानुसार व्यवस्थापनाने अनुसरलेली वस्तूसूचीच्या प्रत्यक्ष पडताळणीची कार्यपद्धती कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरूप लक्षात घेता योग्य व पुरेशी आहे. मात्र तिसऱ्या पक्षांकडील असलेल्या वस्तूसूचींचा त्याला अपवाद आहे.

क) वस्तुसूचीच्याअभिलेखांचे आम्ही केलेले परिक्षण व प्रत्यक्ष पडताळणीचे अहवाल या आधारे आमचे मत आहे की, कंपनी वस्तूसूचीच्या अभिलेखांचे योग्य प्रकारे जतन करीत आहे. कोळश्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही सामग्रीत विसंगत नाही. कोळशातील विसंगतीचे लेखात योग्य समायोजन केले. *फक्त कोळसा धुलाई करणाऱ्यांकडील वस्तुसूचीचा याला अपवाद आहे.*

३. अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या (महानिर्मिती) कंपनीने या वर्षात कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत समावेश केलेल्या अन्य कंपन्या, फर्म्स किंवा इतर संस्था यांना कोणतीही कर्जे मंजूर केलेली नाहीत म्हणून वरील आदेशाच्या परिच्छेद ४ यातील कलम (३) इलेक्ट्रीक च्या उपकलम ‘ए’ ते ‘डी’ नुसार अहवाल देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

ब) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून दिसून येते की, सदर वर्षात कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत समावेश केलेल्या अन्य कंपन्या, फर्म्स किंवा इतर संस्था यांच्याकडून कोणतीही कर्जे घेतली नाहीत म्हणून वरील आदेशाच्या परिच्छेद ४ यातील कलम (३) च्या उपकलम ‘इ’ ते ‘जी’ नुसार कोणताही अहवाल देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

४. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीचे आकारमान व तिच्या व्यवसायाचे स्वरूप याला सुसंगत अशी पुरेशी अंतर्गत नियंत्रण प्रणाली कार्यरत आहे व तिचा उपयोग वस्तु सूचींची व स्थीर मत्तांची खरेदी, तसेच माल व सेवा यांची विक्री यासाठी केला जातो.

५. लेखा पुस्तकांचे आम्ही केलेले परिक्षण व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे याच्या आधारे, कंपनीने कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत नोंद करण्याजोगा एकही व्यवहार केलेला नाही.

६. आमच्या मते व आम्हांस दिलेला स्पष्टीकरणे यानुसार कंपनी अधिनियम १९५६ चे कलम ५८ए आणि ५८एए तसेच कंपनी (ठेवी स्वीकारणे) नियम १९७५, यातील अर्थनुसार कंपनीने जनतेकडून ठेवी स्वीकारलेल्या नाहीत. आम्हास दिलेल्या माहितीनुसार कंपनी लॉ बोर्ड, नॅशनल कंपनी लॉ ट्रायब्युनल, आर.बी.आय्. आणि अन्य कोणतेही न्यायाधिकरण किंवा न्यायालय यांनी कंपनीच्या विरोधात कोणताही आदेश काढलेला नाही.

७. कंपनीने आपले मुख्यालय आणि अन्य जागी अंतर्गत लेखा परिक्षण करण्यासाठी बाह्य सनदी लेखापालांच्या संस्थांची नियुक्ती केली आहे. *मात्र त्यांचे अहवाल वेळेवर मिळालेले नाहीत.* याच्या अधीन राहून आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून कंपनीमधील सध्याची अंतर्गत लेखापरिक्षण प्रणाली ही कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरूप याच्याशी सुसंगत व पुरेशी आहे.

८. केंद्र शासनाने कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २०९ (१) (डी) यानुसार खर्चाच्या नोंदी ठेवण्यासाठी विहीत केलेल्या नियमानुसार, कंपनीने जतन केलेल्या लेखा पुस्तकांचा आम्ही स्थूलपणे आढावा घेतला. मात्र अभिलेख योग्यपणे आहेत असे आमचे प्रथमदर्शनी मत आहे. मात्र या अभिलंखांची अचूकता व परिपूर्णता निश्चित करण्यासाठी आम्ही त्याचे तपशीलवार परिक्षण केलेले नाही.

९. अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून कंपनी सामान्यपणे, निर्विवाद अशी सांविधिक देणी योग्य प्राधिकाऱ्यांकडे नियमीतपणे भरत आहे. यामधे भविष्यनिर्वाह निधी, गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी, कर्मचाऱ्यांचा राज्य विमा, आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, उपकर आणि लागू असणारी अन्ये सांविधिक देणी यांचा समावेश होतो.

आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार निर्विवाद असलेल्या सांविधिक देणी म्हणजे आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क याची थकबाकी ती देय असल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या कालावधीत, ताळेबंदाच्या तारखेस नव्हती.

ब) कंपनीच्या अभिलेखानुसार, खाली दिलेल्या बाबी व्यतिरिक्त आयकर / विक्रीकर / सेवाकर / सीमा शुल्क /

संपत्ती कर / उत्पादन शुल्क / उपकर याचा भरणा करण्यात आला आहे. खालील प्रकरणी वाद आहेत ते असे

| देय रकमेचे स्वरूप | भरणा न केलेली रक्कम | वाद असलेला मंच |
|---|---|---|
| उत्पादन शुल्क | ₹२,६७०,३७५/- | केंद्रिय उत्पादन शुल्क आयुक्त |
| कर निर्धारण वर्ष २००७-२००८ साठी आयकर अधिनियम १९६१ च्या कलम २७१ (सी) नुसार दंड | ₹१,०७३,२१५,४४०/- | आयुक्त (अपील्स) मुंबई |
| सेवा करासाठी १९४ सी नुसार स्रोतापाशी कापलेला कर | ₹८९५,०००/- | आय.टी.ए.टी, पुणे शाखा |

१०. या वित्तीय वर्षाच्या अखेरीस कंपनीकडे कोणतेही संचित तोटे नाहीत. कंपनीच्या लेखा वह्यांनुसार वित्तीय वर्षात आणि नजीकच्या मागील वर्षात कंपनीला कोणताही रोख रकमेचा तोटा झालेला नाही.

११. आमची लेखा परिक्षणाची कार्यपद्धती आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणत्याही वित्तीय संस्थेची किंवा बँक व ऋणपत्रधारक यांच्या थकबाकीची परतफेड थांबविलेली नाही.

१२. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणासही भाग (शेअर्स) ऋणपत्रे किंवा अन्य प्रतिभूती गहाण ठेवून त्याच्या हमीच्या आधारे कोणतेही कर्ज आणि अग्रीम रकमा दिल्या नाहीत.

१३. आमच्या मते आणि आमच्या सर्वोत्कृष्ट माहिती व आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे यानुसार आम्ही नमुद करतो की सदर कंपनी ही एक चीट फंड किंवा निधी / म्यूच्यूअल बेनेफिट फंड / सोसायटी नाही. म्हणून आमच्यामते वरील आदेशाच्या परिच्छेद क्र.४ च्या कलम (१३) यातील तरतुदी सदर कंपनीला लागू होत नाही.

१४. कंपनीचे अभिलेख व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार सदर कंपनी शेअर्स, सिक्युरीटीज, डिबेंचर्स किंवा अन्य गुंतवणूकी यातील व्यवहार करीत नाही म्हणून वरील आदेशाच्या परिच्छेद क्र.४ यातील तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत.

१५. कंपनीचे अभिलेख व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने इतरांनी बँका आणि / किंवा वित्तसंख्या यांच्याकडून घेतलेल्या कोणत्याही कर्जास हमी दिलेली नाही.

१६. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती यानुसार, एकंदरीतपणे कंपनीने यावर्षात मुदत कर्जे ज्या हेतुसाठी मिळविली त्याचसाठी वापरली आहेत.

१७. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आणि आम्ही केलेल्या ताळेबंद व रोकडता प्रवाह विवरणपत्र यांच्या सर्वप्रकारे परिक्षणाप्रमाणे आम्ही नमुद करतो की, अल्प मुदतीच्या निधीतील ₹४९,३९८,३७४,३३२/-

(मागील वर्ष ₹२०,१७२,९६३,२६८/-) दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीसाठी वापरण्यात आले. व्यवस्थापनाच्या मते विविध चालू व अन्य (चालू स्वरुपाच्या नसलेल्या) मत्ता व दायित्त्वे आणि नव्या प्रकल्पांसाठी मुदतीच्या कर्जाच्या रकमेची प्राप्ती प्रलंबित असल्यामुळे घ्याव्या लागलेल्या बँक कर्जे या सर्वांचे पूनवर्गीकरण सुधारीत अनुसूची सहा यांच्या अंमलबजावणीमुळे असे करावे लागले.

१८. या वित्तीय वर्षात अधिनियमाच्या कलम ३०१ अंतर्गत जतन करण्यात येणाऱ्या नोंदणीवहीत समावेश केलेल्या व्यक्ती / संस्था आणि कंपन्या यांना महानिर्मिती कंपनीने कोणत्याही शेअर्सचे विशेष पसंतीने वाटप केलेले नाही.

१९. कंपनीने कोणतीही ऋणपत्रे दिलेली नाहीत; म्हणून हे कलम लागू नाही.

२०. कंपनीने या लेखा परिक्षणाच्या कालावधीत जनतेकडून कोणताही सार्वजनिक निधी घेतलेला नाही. त्यानुसार वरील आदेशातील परिच्छेद ४ च्या कलम (२०) यातील तरतूदी लागू नाहीत.

२१. सर्वमान्य लेखापरिक्षणाच्या पद्धतीनुसार लेखा पुस्तकांचे परिक्षण करताना आम्हास कंपनीबाबत किंवा तिच्यातर्फे कोणतेही लबाडीचे कृत्य दिसलेले नाही. यामध्ये कंपनीच्या दक्षता कक्षाकडील प्रकरणे भारताचे महानियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी वित्तीय वर्षातील चौकश्या यांचाही समावेश आहे.

**सी.व्ही.के. अँड असोशिएटस्**
सनदी लेखापाल
**एफआरएनः १०१७४५ डब्ल्यू**

**के.एस.अय्यर अँड कंपनी**
सनदी लेखापाल
**एफआरएनः १००१८६ डब्ल्यू**

**जी.एम.कापाडीया अँड कं.**
सनदी लेखापाल
**एफआरएनः १०४७६७ डब्ल्यू**

**अशोक के. प्रधान**
भागीदार
एम.नं. ३२१५६

**राजेश एस. जोशी**
भागीदार
एम.नं. ३८५२६

**राजन आर. अशर**
भागीदार
एम.नं. ४८२४३

स्थळ : मुंबई
दिनांक : २१ सप्टेंबर २०१२

# ३१ मार्च २०१२ रोजीचा ताळेबंद

(रक्कम ₹ मध्ये)

| | | | टिपा क्र. | ३१-०३-२०१२ | ३१-०३-२०११ |
|---|---|---|---|---|---|
| १. | **समभाग व दायित्त्वे** | | | | |
| | (१) | भागधारकांचा निधी | | | |
| | | (अ) भाग भांडवल | १ | ५१,४०८,४६७,००० | २५,०००,५००,००० |
| | | (ब) राखीव व अधिक्य | २ | ११,७२५,०८२,६९५ | ९,७२१,९११,१७१ |
| | (२) | भाग अर्ज निधी : वाटप प्रलंबित असलेला (पहा - टिपा क्र.२४) | | ५,७७७,९३३,५३७ | २२,९६५,०००,५३७ |
| | (३) | चालू नसलेली दायित्त्वे | | | |
| | | (अ) दीर्घ मुदतीची कर्जे | ३ | १२३,९११,७९८,८१० | १०९,२१३,६५२,६२३ |
| | | (ब) स्थगित कर दायित्त्व (निव्वळ) | ४ | ७,७७९,०८३,९४१ | ८,१८९,२४१,८०९ |
| | | (क) दीर्घ मुदतीची इतर दायित्त्वे | ५ | ११,२५९,७४९,९४७ | १३,४६२,०६१,६८४ |
| | | (ड) दीर्घ मुदतीच्या तरतुदी | ६ | ६,३१७,१९५,८७१ | ६,६५७,१८६,८२८ |
| | (४) | चालू दायित्वे | | | |
| | | (अ) अल्प मुदतीची कर्जे | ३(अ) | ६१,५०९,०५०,००० | ४९,२५१,९५७,२५६ |
| | | (ब) व्यापारी देणी | | ३१,०३५,६३६,३३७ | ३२,५९८,८३२,५०५ |
| | | (क) इतर चालू दायित्वे | ७ | ४८,०७३,८००,६९३ | ३१,१४४,५९३,८७८ |
| | | (ड) अल्प मुदतीसाठी तरतुदी | ६ | १,९८६,९१३,९६५ | २,३६९,८५६,८८५ |
| | **एकूण** | | | **३६०,७९२,७१२,७९६** | **३१०,५७४,८०३,१७६** |
| २. | **मत्ता** | | | | |
| | **चालू नसलेल्या मत्ता** | | | | |
| | (अ) | स्थीर मत्ता | | | |
| | | १. मूर्त मत्ता (निव्वळ गट) | ८ | ८५,४४५,५४०,२७० | ८६,९३९,९३९,३५६ |
| | | २. अमूर्त मत्ता | ८ | २५,८१९,६११ | ३०,१३८,६७९ |
| | | ३. प्रगती पथावरील भांडवली कामे | | १६०,५६९,०८४,२०१ | १०७,७०२,५१७,८७५ |
| | | ४. अमूर्त मत्ता विकासित होणाऱ्या | | २५४,४५९,०१७ | २८,५३६,२८४ |
| | (ब) | चालू नसलेल्या गुंतवणूकी | ९ | २६,६००,००० | १,६००,१०० |
| | (क) | दीर्घ मुदतीचा कर्जे व अग्रीमे | १० | १५,५३१,६०२,१५२ | १६,३४२,३५९,४७२ |
| | (ड) | चालू नसलेल्या इतर मत्ता | ११ | ५,७३२,५८०,८८२ | ४,३३७,४३४,१५४ |
| | **चालू मत्ता** | | | | |
| | (अ) | चालु गुंतवणूकी | | - | - |
| | (ब) | वस्तूसुची | १२ | १४,२४४,२१८,७६४ | १२,७३३,६७७,६७७ |
| | (क) | व्यापारातील प्राप्ती | ११ | ३७,२२६,४३८,६१२ | २२,८००,०६४,७४८ |
| | (ड) | रोकड व रोकड समतूल्य | १३ | २९८,७१३,६५१ | ४३४,१३४,०९७ |
| | (इ) | लघू मुदतीची कर्जे व अग्रीमे | १० | ३१,३७२,८१९,९४१ | ३४,६२३,४२५,७६९ |
| | (फ) | इतर चालू मत्ता | १४ | १०,०६४,८३५,६९५ | २४,६००,९७४,९६५ |
| | **एकूण** | | | **३६०,७९२,७१२,७९६** | **३१०,५७४,८०३,१७६** |
| | वित्तीय विवरण पत्राच्या सोबत जोडलेल्या टिपा पहाव्यात | | | | |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार
**सी.व्ही.के. आणि असोसिएटस् करिता**
सनदी लेखापरीक्षक
(एफआरएन - १०१७४५ डब्ल्यू)

**ए. के.प्रधान**
भागीदार (मेंबरशिप क्रमांक ३२१५६)

**के. एस. अय्यर आणि कंपनीकरिता**
सनदी लेखापरीक्षक
(एफआरएन - १००१८६ डब्ल्यू)

**राजेश एस. जोशी**
भागीदार (मेंबरशिप क्रमांक ३८५२६)

**जी. एम. कपाडीया आणि कंपनीकरिता**
सनदी लेखापरीक्षक
(एफआरएन - १०४७६७ डब्ल्यू)

**राजन अशर**
भागीदार (मेंबरशिप क्रमांक ४८२४३)
मुंबई, २१ सप्टेंबर २०१२

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

**जे.के.श्रीनिवासन**
संचालक (वित्त)

**आशिष शर्मा**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**एस.के. लाबडे**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव

# ३१ मार्च २०१२ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा-तोटा पत्रक

(रक्कम ₹ मध्ये)

| | | | टिपा क्र. | २०११-२०१२ | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रवर्तनापासूनचा महसूल | | १५ | १२७,७३०,९५९,२९१ | १२१,४१८,३०४,२७३ |
| २. | इतर उत्पन्न | | १६ | १,५०२,८८७,३०७ | ८९४,२०२,१५० |
| **३.** | **एकूण उत्पन्न (१+२)** | | | **१२९,२३३,८४६,५९८** | **१२२,३१२,५०६,४२३** |
| ४. | खर्च | | | | |
| | (अ) | वापरलेल्या सामग्रीचा खर्च | १७ | ९५,२८२,१२५,१०९ | ८२,८१७,३१६,३३२ |
| | (ब) | कर्मचारी लाभ खर्च | १८ | ७,९३२,७३३,३७० | ८,७०५,५९९,३३२ |
| | (क) | वित्तीय खर्च | १९ | ८,५३६,८०४,०५६ | ६,५७४,३३१,४२३ |
| | (ड) | घसारा / कर्ज फेडीची तरतूद | ८ | ४,०३८,८६५,११४ | ४,१८१,२७१,५९० |
| | (इ) | इतर खर्च | २० | ११,४४२,३१३,२९३ | १२,०३४,२५८,०६८ |
| | **(फ)** | **एकूण खर्च** | | **१२७,२३२,८४०,९४२** | **११४,३१२,७७६,७४५** |
| ५. | कर पूर्व नफा | | | २,००१,००५,६५६ | ७,९९९,७२९,६७८ |
| ६. | कर खर्च | | | | |
| | (अ) | चालू कर | | ४०८,०००,००० | १,७२४,०००,००० |
| | (ब) | स्थगित कर | | (४१०,१५७,८६८) | ३,१८१,१६२,३२६ |
| | | | | | |
| **७.** | **नफा/तोटा या कालावधीचा** | | | **२,००३,१६३,५२४** | **३,०९४,५६७,३५२** |
| ८. | प्रति समभाग मिळकत | | | | |
| | | (१) मूळ | | ०.३८ | ०.६८ |
| | | (२) सौम्य केलेली | | ०.३८ | ०.६८ |
| | | वित्तीय विवरणपत्राच्या सोबत जोडलेल्या टिपा पहाव्यात | | | |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार
**सी.व्ही.के. आणि असोसिएटस् करिता**
सनदी लेखापरीक्षक
(एफआरएन - १०१७४५ डब्ल्यू)

**ए. के.प्रधान**
भागीदार (मेंबरशिप क्रमांक ३२१५६)

**के. एस. अय्यर आणि कंपनीकरिता**
सनदी लेखापरीक्षक
(एफआरएन - १००१८६ डब्ल्यू)

**राजेश एस. जोशी**
भागीदार (मेंबरशिप क्रमांक ३८५२६)

**जी. एम. कपाडीया आणि कंपनीकरिता**
सनदी लेखापरीक्षक
(एफआरएन - १०४७६७ डब्ल्यू)

**राजन अशर**
भागीदार (मेंबरशिप क्रमांक ४८२४३)
मुंबई, २१ सप्टेंबर २०१२

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

**जे.के.श्रीनिवासन**
संचालक (वित्त)

**आशिष शर्मा**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**एस.के. लाबडे**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव

# वित्तीय विवरण पत्रांवर टिपा

## १. दि.३१ मार्च २०१२ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्राचा भाग असलेल्या लेखांवरील टिपा आणि महत्त्वाची लेखाविषयक धोरणे.

### ए) वित्तीय विवरणपत्रे तयार करण्याचे आधारतत्त्व

महाराष्ट्र राज्य वीज निर्मितीकंपनी ही कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतुदींनुसार नोंदणी केलेली एक सार्वजनिक मर्यादित कंपनी (पब्लिक लिमिटेड) संस्था आहे. ही कंपनी विद्युत अधिनियम २००३ याने शासित आहे. जेव्हा कंपनी अधिनियम १९५६ यातील तरतूदी विद्युत अधिनियम २००३ व त्यांची नियमावली यातील तरतुदीस विंसगत असतील तेव्हा विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १७४ यातील अटींनुसार विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदी अभिभावी होतील.

सदर लेखा 'चालु असणारी संस्था' या संकल्पनेच्या व ऐतिहासिक खर्च संकेत या आधारे तयार केले आहेत. सर्वसाधारणपणे सर्वमान्य असलेली लेखातत्वे व अधिसूचना क्र.जी.एस.आर. ७३९ (इ.) दि.७ डिसेंबर २००६ यानुसार केलेली नियमावली यातील प्रत्यक्ष बाजू याची पूर्तता करण्यासाठी कंपनी लेखा तयार करताना उपार्जन तत्त्वाचा अवलंब करते.

### बी) अंदाजाचा वापर

सर्वसाधारण सर्वमान्य लेखा तत्त्वांच्या सुसंगत अशी वित्तीय विवरणपत्रे तयार करण्यासाठी त्यातील तारखांना नोंदलेल्या मत्ता व दायित्वे याच्या रकमांवर तसेच अहवाल काळातील महसूल व खर्च याच्या रकमांवर परिणाम करतील असे अंदाज व गृहीते करावी लागतात. ज्या कालावधीत निकाल माहिती झाले / प्रत्यक्षात दिसून आले त्यात निकाल व अंदाज यातील फरक मान्य केले जातात.

### सी) मूर्त स्थीर मत्ता

(१) कंपनीच्या स्थीर मत्ता लेखा पुस्तकांत नोंदल्या जातात व ऐतिहासिक खर्चानुसार वार्षिक लेखात जाहीर केल्या जातात. स्थीर मत्ता या संपादनाचा किंवा बांधकामाचा खर्च वजा संचित घसारा याप्रमाणे नमूद केल्या जातात.

(२) संपादनाच्या खर्चात वाहतूक आकार, शुल्के व कर (कर्ज प्राधिकारी यांच्याकडून पूनःप्राप्त असणारे वगळून), वसुली, कर्जाचा खर्च व सदर मत्ता तिच्या उद्देशित वापरासाठी तयार करण्याकरिता केलेले सर्व प्रासंगिक खर्च समाविष्ट आहेत.

(३) नवे प्रकल्प / विस्तार या स्थीर मत्ता कार्यान्वित करण्याच्या तारखेपर्यंत करावे लागणारे संबंधित खर्च / व्याज खर्च यांचे भांडवलीकरण केले जाते.

(४) कंपनीने स्वतःच्या मालकीचा हक्क नसणाऱ्या स्थीर मत्ताच्या उभारणीसाठी केलेला खर्च, अशा मत्तांचे उभारणीचे काम चालू आहे तो पर्यंत 'प्रगतीपथासाठी भांडवली कामे' याचा भाग असा दाखविला जातो. त्यानंतर तो स्थीर मत्तांच्या अनुसूचीत ''कंपनीचे मालकी नसलेल्या मत्ता निर्मितीचा भांडवली खर्च'' या लेखा शीर्षकाखाली दाखविण्यात येतो.

(५) ज्या प्रकरणी अनामत रकमा / कामाचे कंत्राट यानुसार भांडवली कामे प्रगतीपथावर असतात आणि कंत्राटदाराची देयके अंतीमतः चुकता करणे पूर्ण झाले नसेल तर त्याचे अंतीम देणे ज्यावर्षी पूर्ण होईल त्याच्या आवश्यक समायोजनाच्या अधीन राहून त्यांचे भांडवलीकरण हंगामी तत्त्वावर केले जाते.

(६) भांडवली कंत्राटाची किंमतीतील फरकाचे दावे असल्यास ते कंपनीने स्वीकारल्यावर त्यांची लेखा नोंद केली जाते.

(७) कंपनीचे प्रकल्प व युनीटचे नियोजन करणे यासाठी कालावधीत केलेला खर्च हा संबंधित प्रगतीपथावरील भांडवली कामे यांच्या लेखात अर्थवृद्धीच्या आधारे संविभाजित केला जातो.

(८) प्रकल्प / वीज निर्मिती यासाठीचा प्रायोगिक तत्त्वावरील खर्च व त्यातून प्राप्त महसूल / उत्पन्न यांचे भांडवलीकरण केले जाते.

(९) एखाद्या प्रकल्पाच्या मंजुरीसाठी तो शोधणे, सर्वेक्षण करणे व सिद्धतेसाठी अभ्यास करणे यावरील खर्च हा सदर प्रकल्प अंतीमतः नाकारणे किंवा तीन वर्षे पर्यंत यापैकी जे आधी असेल ते, तोपर्यंत 'प्रगतीपथावरील भांडवली कामे' यामध्ये लक्षणीय बाब असा दाखविला जातो. जर नाकारला तर सदर खर्च नाकारण्याच्या वर्षात महसूलात आकारला जातो.

(१०) जर काही स्थीर मत्तां करीता शासकीय अनुदाने मिळाली असतील तर त्या स्थीर मत्ता लेखा पुस्तकात अनुदानाच्या निव्वळ प्राप्तीनुसार दाखविल्या जाता.

(११) ज्या स्थीर मत्तांची प्रत्येकी किमंत ₹५०००/- पर्यंत असेल त्यांची खरेदी वर्षात घसारा संपूर्णतः केला जातो. मोबाईल फोनची किंमत खरेदी वर्षात महसूलात आकारली जाते.

(१२) ज्या मत्ता निवृत्त केल्या जातात व विक्रीसाठी काढल्या जातात त्यांचे मूल्य, किंमतीप्रमाणे किंवा निव्वळ वसूली योग्य मूल्य, यापैकी जे कमी असेल, त्याप्रमाणे केले जाते.

**(१३) अमूर्त मत्ता**

अमूर्त मत्तांच्या बाबतीत जर अशा मत्तांचे भविष्यात आर्थिक फायदे कंपनीकडे प्रवाहीत होणार असतील तर त्यांचे खर्च वजा कर्ज फेडीची संचित तरतूद व कमी करण्यातील तोटे, याप्रमाणे त्याचे भांडवलीकरण केले जाते.

**डी) कर्ज खर्च**

पात्र मत्ताचे संपादन किंवा, बांधकाम याच्या खर्चाचे भांडवलीकरण 'मत्ताच्या खर्चाचा एक भाग' याप्रकारे केले जाते. पात्र मत्ता म्हणजे अशी मत्ता जी उद्देशित उपयोगासाठी तयार होण्यास बराच अवधी लागतो. कोणत्याही भांडवली मत्ताचे संपादन किंवा बांधकाम यासाठी न लागलेल्या कर्जाच्या खर्चास, ज्या काळात करण्यात आले त्यातील खर्च म्हणून मान्य केले जातात.

**ई) मत्ता कमी करणे**

कंपनी ताळेबंदाच्या तारखेला प्रत्येक स्थीर मत्ताचे तसेच रोकड निर्मितीचे घटक (सी.जी.यू.) यात समाविष्ट होणाऱ्या मत्तांच्या गटांचे जर त्या कमी करण्यासाठी आवश्यक असतील तर मूल्यांकन करते. अशा मत्ता किंवा रोकड निर्मितीचे घटक (सी.जी.यू.) चालू ठेवण्याचा खर्च वसूल होणाऱ्या खर्चापेक्षा जास्त असेल तर त्या कमी करण्याची तरतूद केली जाते.

**एफ) महत्त्वाची / विम्याची यंत्रे सुटेभाग**

(१) कारखाना व यंत्रे यासोबत यंत्राचे सुटे भागही मिळविले जातात. ज्यांचा उपयोग अनियमीत असल्याचे अपेक्षित असेल तर आणि त्या सुट्या भागांचा खर्च माहिती असेल तर त्यांचे वेगळे भांडवलीकरण संबंधित कारखान्या समवेत केले जाते.

(२) त्यानंतर प्रापण केलेल्या सुट्या भागांचे भांडवलीकरण खरेदी वर्षात केले जाते.

(३) संबंधित कारखाना व यंत्रे याच्या शिल्लक उपयोगी आयुष्याकरिता सुट्या भागांचा पूर्ण घसारा केला जातो

